

# श्री साईलीला

बर किं. ५० पैसे १९६९

# या अंकांत—

१ प्रियवाचक — संपादकीय
२ एकावन्नावा पुण्यतिथी महोत्सव
३ स्वामी विवेकानंदांची अमृतवाणी
४ जीवनाचा शोध घेणारा महात्मा
५ मनांत आलें कीं —
६ श्रीराम हेंच सर्वस्व — सुलभ वेदान्त
७ श्रीगोंदवलेकर महाराज — कांहीं बोध कथा
८ स्वामी विवेकानंदांचें प्रभावी कार्य
९ बेलूरमठ व रामकृष्ण मिशन
१० संतकवि श्रीदासगणू महाराज



# श्री साई वाक्सुधा

भगवंताच्या स्वरूपाचें आकलन करतां यावें यासाठीं मानवाची निर्मिती करण्यांत आली. त्यासाठीं त्याला सारासार बुद्धिमत्ता दिली. तिच्यायोगें भगवंताची त्याला कल्पना व्हावी आणि ज्याला ही कल्पना झाली तोच ज्ञानसंपादनाच्या मार्गें लागेल त्यालाच अहर्निश माझें चिंतन करावें असें वाटेल. असें घडून येईल तेव्हांच माझ्या खेळाची पूर्णता झाली असें मी समजेन.

—श्रीसाईसच्चरित

---


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४८ वें ] डिसेंबर १९६९ [ अंक ९ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४

# ❀ संपादकीय ❀

प्रिय वाचक—

आपला देश सध्यां आत्यंतिक आणीबाणीच्या व क्रांतिकारक काळांतून जात आहे. सर्वच बाबतींत अकल्पित थारेपालट घडून येत आहेत. अशावेळीं आपलें कर्तव्य कोणतें आम्हीं काय करणें जरूर आहे आज आपल्या देशाला जास्तींत जास्त कोणत्या गोष्टींची नि कोणत्या गुणांची आवश्यकता आहे याचा प्रत्येकानें विचार करण्याचा हा काळ आहे. अशावेळीं आपल्यांत होऊन गेलेल्या थोरामोठ्यांचे मार्गदर्शन, त्यांचें वक्तव्य नि वागणूक यांचा फार उपयोग होत असतो.

सध्यांच्या या क्रांतिकारक काळांत आम्हांला सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीं याच डिसेंबर महिन्यांत एका थोर भारतीय द्रष्ट्या महान् विभूतीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. अतुलनीय देशप्रेमानें व देशांतील आपल्या बांधवांच्या वाट्यास आलेली अत्यंत हलाखीची स्थिति पाहून त्यांचें अंतःकरण तळमळत होतें; तडफडत होतें. त्या थोर विभूतीचें नाव होतें स्वामी विवेकानंद. त्यानीं आपल्या अवघ्या अल्प हयातींत आपल्या बांधवांना जागृत करण्यासाठी व त्यांच्यात चैतन्य निर्माण करण्यासाठीं आपल्या जीवाचें रान केलें. याच देशांत नव्हे तर यूरोप अमेरिकेसारख्या देशांतही.

अमेरिकेत किंवा इंग्लंडांत जाण्यापूर्वी त्यानीं देशभर हिंडून लोकस्थितीची बारकाईनें पहाणी केली आणि स्वामीजी आपल्या देशाच्या अगदीं एका टोकाला अर्थात् कन्याकुमारीला गेले व तेथील प्रचंड खडकावर उभे राहून त्यांनीं आपल्या देशावर दूरवर नजर टाकिली.

केप कामोरीन हें भारताचें एक टोक. तेथील प्रचंड सागरांत निर्माण झालेलें तें लहानसें बेट. तेथील खडकाळ भागावर देवी कन्याकुमारीचें मंदिर आहे. त्या मंदिरांत स्वामीजीनीं एक रात्र देवीच्या ध्यानधारणेंत घालविली.

त्यांच्या नि भारताच्या दृष्टीनें ती रात्र अत्यंत महत्त्वाची होती. त्यांना देवी प्रसन्न झाली व त्यांना तेथें कांहींना कांहीं दृष्टांत झाला. त्यांना स्वकर्तव्याची जाणीव झाली. त्यांच्या वाणीत व वागण्यांत धारदारपणा व करारीपणा आला. त्यांच्या वाणीत अपरंपार अमोघत्व आलें. तेथून त्यानीं आपल्या देशबांधवांस आणीबाणीची हांक मारिली आणि ती हाक त्यांच्या जीवनेतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवली गेली आहे. तो डिसेंबर महिना होता.

स्वामीजी म्हणतात "माझ्या भारतीय बंधूनो, आज तुमच्या देशाला शूरांची नि वीरांची फार जरूरी आहे. तेव्हां तुम्ही शूरवीर बनण्यासाठीं झटा. त्या खडकावर उभा राहून मी तुम्हांला हाक मारीत आहें त्या खडकासारखे दणकट व खंबीर आणि स्थिर बना. अनेक वर्षांपासून अनेक कारणामुळें तुम्हीं चैतन्यहीन बनळां आहांत. आज तुम्हाला जर कशाची जरूरी असेल ती आळस टाकून कर्तव्याभिमुख होण्याची, स्वकर्तव्य ओळखून धडाडीनें कामास लागण्याची. माणूस मरतो तो एकदाच परंतु तुमच्या वाट्यास रोजचें मरण आलें आहे. तुम्हीं आज मृतवत् स्थितींत आहांत. त्या स्थितीचा त्याग करून खड-बडून उठा आणि धडाडीनें कामास लागा. ज्यांचा शिष्यत्वाच्या नात्यानें किंवा कोणत्याही नात्यानें माझ्याशीं संबंध येतो त्यानीं भ्याडपणाचा त्याग केला पाहिजे. त्यानीं शूरवीर बनलें पाहिजे. मी जर कशाचा द्वेष करीत असेन तर तो भ्याड-पणाचा. आणि तोच तर तुमच्या रोमरोमांत भरून राहिला आहे. तुम्हांला विजेचे धक्के देऊन जागे केलें पाहिजे, खडबडून हालविलें पाहिजे. वाट्यास येईल तो त्याग करणाऱ्या माणसांची आज फार जरूरी आहे. आज त्यागी व देशासाठी वाटेल तें करण्यास तयार असणारीं माणसें हवीं आहेत. देशाचें भवितव्य अशा धडाडीच्या, ताज्या रक्ताच्या माणसांवर अवलंबून आहे. अशीं माणसें पुढें येतील तेव्हांच आपला देश पुढें येईल, व प्रत्येक बाबतींत आपलें वैशिष्ट्य प्रगट करील."

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीच्या काळांत स्वामी विवेकानंदानीं आपल्या देशबंधूंना तळमळीने मारलेली ही हांक आहे. आणि आज पंतप्रधान इंदिरा गांधी तरी यापेक्षां दुसरें काय सांगत आहेत ?

—संपादक

# श्रीसाईबाबांची एकावन्नावी पुण्यतिथी

(आमच्या प्रतिनिधीकडून)

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज यांचा ५१ वा पुण्यतिथीचा उत्सव दिनांक १९।१०।६९ रविवार पासून प्रारंभ होऊन दिनांक २२।१०।६९ बुधवार रोजी गोपालकाला, दहीहंडी, कीर्तन होऊन समाप्त झाला.

या उत्सवा करितां साईबाबासंस्थानचे मे.कोर्टरिसिव्हर साहेब यानीं खाते-प्रमुखांची सभा अगोदर घेऊन कामाची व्यवस्था करणेबाबत विचार विनिमय करून निश्चित कामाची व्यवस्था केली. त्याप्रमाणें मांडवाची साफसफाई पिण्याचे पाण्याची स्वच्छता राहण्याच्या खोल्यांची साफसफाई,रंगरंगोटी, दिव्यांची सोय, कलाकारांची सोय, जेवण फराळाची व्यवस्था निश्चित केली.

चालू साली उत्सवाकरितां मुंबई, पुणें, हैद्राबाद, नागपूर, म्हैसूर, मद्रास, खानदेश वगैरे ठिकाणाहून बरीच भक्तमंडळी आली होती.

उत्सवाचा कार्यक्रम ता. १९।१०।६९ रविवार रोजी नियमित कार्यक्रमा-व्यतिरिक्त श्रीच्या फोटोची व ग्रंथाची मिरवणूक पहाटे ६वाजतां समाधिमंदिरा-तून निघून गुरुपादुकामार्गे श्रींचे द्वारकामाईंत आली. अखंड साईसच्चरित्रवाचन चौवीस तास होऊन दुसरे दिवशी परत मंदिरांत पालखी येऊन हा कार्यक्रम समाप्त झाला. रविवारी भक्तांच्याअभिषेकपूजा सामुदायिक रीत्या करण्यांत आल्या. त्याच प्रमाणें श्रींच्या कपड्यांची प्रसादरूपानें विक्री झाली. दुपारीं ४।६ पर्यंत श्रींचे समाधि-मंदिरात कीर्तन झालें. रात्रौ ९ते१० पर्यंत श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक, व शेजारती झाली. त्यानंतर श्रींचे मंदिरानजीकचे भव्य पटांगणात मुंबईचे सुप्रसिद्ध कलाकार श्री. सी. रामचंद्र आणि मंडळी यांचे (गीतगोपाल) या श्री. ग. दि, माडगुळकरकृत काव्याचे संगीत गायन भव्य स्टेजवर फारच सुंदर झाले. कार्यक्रमास गर्दी बरीच होती.

ता. २०।१०।६९ ( विजयादशमी ) सोमवार रोजीं पहांटे नित्यकार्यक्रमा-व्यतिरिक्त श्रींचे द्वारकामाईंत २४ तास अखंड चरित्र वाचन समाप्त होऊन फोटोची चरित्राची मिरवणूक निघून गुरुपादुका, व सामुदायिक अभिषेक सुरू झाले. श्री. सी. रामचंद्र आणि पार्टी यांचे संगीत भजनही झालें. यातील सर्व कलाकाराना प्रत्येकी एक रुपया व नारळ प्रसाद संस्थानतर्फे देण्यात आला. त्यानंतर श्रींची (भिक्षा) मिरवणूक गांवांतून निघाली. श्रींचे कापडाची विक्री प्रसादरूपानें करण्यात आली. सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत श्रींचे समाधिमंदिरात संस्थानगवई श्री. विठ्ठलराव मराठे यांचे श्री. साईबाबा पुण्यतिथी आख्यानावर कीर्तन झालें. त्यानंतर (आराधनाविधी) पूजा श्री. विठ्ठलराव बागवे (मंदिर-इन्चार्ज) यांचे हस्ते झालें. सायंकाळी सीमोल्लंघन मिरवणूक व रात्रौ श्रींचे रथाची मिरवणूक गारुड, भारुड, भजनी दिंडी मुंबई येथील बँडपथक सूरसनई चौघडा यांसह गांवांतून मिरवणूक निघाली. नंतर रात्रभर जागर, कलाकारांची हजेरी व कलाकारांस प्रत्येकी एक रुपया, व नारळ प्रसाद, संस्थानतर्फे देण्यात आला. रात्रभर दर्शनासाठी मंदिर खुलें ठेवण्यात आलें होतें.

ता, २१।१०।६९ मंगळवार रोजी कार्यक्रम नेहमीप्रमाणें होऊन रात्रौ श्री. ह, भ, प, लक्ष्मणबुवा वाघचौरे यांचें श्रीमंदिरात भजन कीर्तन झालें.

ता. २२।१०।६९ बुधवाररोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांची सामुदायिक अभिषेक पूजा व ११ ते १२ पर्यंत श्री. विठ्ठलराव मराठे सं. गवई यांचें गोपालकाल्याचें कीर्तन दहीहंडी झाली. नंतर आरती तीर्थ प्रसाद होऊन उत्सव समाप्त झाला. या उत्सवानिमित्त साईसंस्थानतर्फे कर्मचारी, सेवेकरी, अधिकारी, व सन्माननीय पाहुणे याना उत्सवाचे तीन दिवस फराळ, लाडू, चिवडा. देण्यात आला. शेवटचे दिवशी मिष्टान्नाचें भोजनही देण्यात आलें. उत्सवात भक्तांना संस्थानचे अधिकृत भोजनगृहात तीन दिवस नेहमीचेच दरात मिष्टान्नाचें भोजन देण्यात आलें. या प्रमाणें श्रीसाईबाबा पुण्यतिथीउत्सव थाटांत साजरा झाला.

# स्वामी विवेकानंदांची अमृत वाणी

स्वामी विवेकानंद हे एक थोर भारतीय द्रष्टे महाभाग होत. अनेक वर्षे होऊन गेली तरी त्यांची अमोघ नि प्रत्येकांत चैतन्य, स्फूर्ति व कर्तव्यनिष्ठा निर्माण करणारी वाणी आजच्या काळांतही प्रत्येकास प्रगति पथावर घेऊन जाणारी आहे. त्यांच्या वाङ्मयांतील निवडक रत्नांचा हा बहुमोल रत्नहार आहे.

—संपादक

—बल हेंच जीवन, दुर्बलता म्हणजे मृत्यु, हें एक महान सत्य होय. बल दिव्य-सुख हेच अनंत अमर जीवन, दुर्बलता म्हणजे सतत चिंता निरंतर दुःख दुर्लबता म्हणजेच मृत्यु.

—हें जग भेकड माणसांसाठीं नाहीं. पळून जाण्याचा यत्न करूं नका. जया-पजयाकडे लक्ष देऊं नका.

—वेदान्त पापाचें अस्तित्व मानीत नाहीं, फक्त भ्रांतीचेंच मानतो. 'मी कमकुवत आहें. मी दुःखी आहें. माझ्या ठिकाणीं बळ मुळींच नाही, मीं कार्य करण्यास असमर्थ आहें,' असें म्हणणें हाच सर्वांत मोठा भ्रम होय. वेदान्त आपल्याला हेंच सांगतो.

—उठा आणि या चालत्या गाड्याला चालू ठेवण्यास हातभार लावा. हें जीवन आणखीन किती दिवस टिकणार आहे ? जन्माला आलाच आहांत तेव्हां कांहीं-तरी महत्त्वाचें कार्य करून जा, कांहीतरी भरीव कार्य करून जा. नाहींतर तुमच्यांत व वृक्षपाषाणांत काय भेद ? तीं देखील अस्तित्वांत येतात, झिजतात आणि शेवटीं नष्ट होतात.

——आज आपल्या देशाला लोखंडी स्नायूंची आणि मज्जातंतूंची खरी गरज आहे. अशा दुर्दम्य इच्छाशक्तीची कीं जीं विश्वाचीं गूढ रहस्यें उकलील आणि जरूर पडल्यांस महासागराच्या देखील तळाशीं जाऊन व प्रत्यक्ष मृत्यूला तोंड देऊन आपलें उद्दिष्ट हस्तगत करून घेईल.

——विश्वास ! विश्वास ! आणि ईश्वरावर विश्वास. महानतेचें रहस्य हेंच. पुराणांत वर्णिलेल्या तेहतीस कोटि देवांवर व परकीयांनीं वेळोवेळीं तुमच्यामध्यें रूढ केलेल्या समस्त देवतांवर तुमचा विश्वास असला, पण स्वतःवर मात्र नसला तर तुम्हांला मुक्ति प्राप्त होणार नाही. स्वतःवर विश्वास ठेवा. तो अढळ राहूंद्या आणि शक्तिशाली बना. याचीच आज आपल्याला नितान्त आवश्यकता आहे.

——स्वतःचा विकास करा, ध्यानांत ठेवा कीं गति आणि वाढ हीच केवळ जीवंतपणाचीं लक्षणें होत.

——स्वतःवरील विश्वास हरवणे म्हणजे ईश्वरावरील विश्वास हरवणेच होय. तो अनंत शिवस्वरूप परमात्मा तुमच्याद्वारें कार्य करीत आहे यावर तुमचा विश्वास आहे काय ? तो सर्वव्यापी प्रभु तुमच्या देहामध्यें, तुमच्या आत्म्यामध्यें अगदीं अणुरेणूमध्यें ओतप्रोत भरलेला आहे अशी जर तुमची श्रद्धा असेल तर तुम्हीं हताशच कसे होऊं शकतां ?

——"मी गरीब आहें, मला मित्र नाहीत, अशी विवंचना करीत बसूं नका. पैशाने खरा माणूस' निर्माण केला असें कधीं कुणी पाहिले आहे काय ? माणूसच पैसा निर्माण करीत असतो. मानवी शक्ति, आत्मविश्वासाचें बल आणि उत्साह यांनीच हें आजचें जग निर्मिलें आहे.

——पवित्र होण्याच्या प्रयत्नांत शुद्ध बनण्याच्या या साधनेंत शरीर नष्ट झालें तरी बेहत्तर. या कार्यात मृत्यूचें सर्वदा स्वागत असो. आशा सोडूं नका हाताश होऊं नका. अमर बनविणारें मधुर अमृत मिळालें नाहीं म्हणून काय आपण विषपान करावें ?

——जिथें हृदयाची प्रामाणिकता आणि हेतूची विशुद्धता आहे तिथें विजय हा ठेवलेलाच. यापैकीं गुणांनी संपन्न असलेले लोक थोडेसेच जरी असले तरी ते सर्व प्रकारच्या अडचणीवर निश्चित मात करतील यांत शंका नाही.

——स्वार्थत्यागच विश्वाचा परमोच्च धर्म असून स्वार्थपरता हा अधर्म होय

—मनुष्यमात्रांतीला स्वार्थ म्हणजे मूर्तिमंत सैतानच होय. स्वार्थाचा थोडासा गंध देखील सैतानाचेंच स्वरूप होय. स्वार्थ नष्ट होतांच तुमच्यामध्यें ईश्वराचाच आविर्भाव होतो.

—महान त्यागानेच महान कार्ये होऊं शकतात.

—ईश्वर आणि सैतान यामध्यें भेद जर कोणता असेल तर तो हाच कीं ईश्वर संपूर्णतया निःस्वार्थी आहे आणि सैतान पूर्ण स्वार्थी.

—निःस्वार्थीपणामुळें खरोखर अधिक लाभ होतो, पण लोकांना हा गुण अंगी बाणवून त्याप्रमाणे वागण्याचा धीर नसतो एवढेच

—आपले सर्वोत्कृष्ट कर्म तेव्हांच घडेल, प्रबलतम प्रभाव तेव्हांच पडेल कीं जेव्हां स्वतःबद्दलचा विचारही आपल्याला शिवणार नाहीं.

—दयेने प्रेरित होऊन दुसऱ्याचे भले करणे हें तर ठीकच आहे पण ईश्वरबुद्धीनें प्राणिमात्राची केलेली सेवा ही त्याहून चांगली होय.

—मानवजातीची सेवा करावयास मिळणे हें आपले महद्भाग्य होय, कारण ही सेवा म्हणज ईश्वराचीच उपासना होय. मानवमात्रांत ईश्वरच विराजमान आहे. मानवात्मा म्हणजेच ईश्वर.

—मत्सर हा गुलामांच्या कपाळीं प्रकृतीने न चुकतां मारलेला शिक्का आहे. गुलाम म्हणजेच मत्सरी. आपल्या कपाळावरील हा शिक्का आपण पुसून टाकूं या. कुणाचाहि मत्सर करूं नका. सत्कर्म करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याला सहाय्य करण्यास नेहमीं तत्पर असा. विश्वांतील सर्व जीवांच्या कल्याणाचेंच सदैव चिंतन करा.

—जीवन हें अल्पकाळ टिकणारें आहे. संसारांतील असार सुखभोग क्षणभंगुर आहेत. दुसऱ्यासाठीं जे जगतात तेच खऱ्या अर्थानें जीवंत असतात. बाकीचे सारे जीवंत असूनहि मेल्यासारखेच होत.

—ही जाणीव असूं द्या कीं, एकाद्याच्या पाठीमागे त्याची निंदा करणें पाप होय. मनामध्यें पुष्कळशा गोष्टी उद्भवतील, पण त्या सर्वच व्यक्त करूं जाल तर हळू हळू राईचा पर्वत बनेल. तुम्ही जर क्षमा कराल आणि पूर्वीचें सर्व कांही विसरून जाल तर सारें वैमनस्य सारे मनोमालिन्य नाहीसें होऊन जाईल.

—गांभीर्याला बालकांच्या सरलतेची जोड द्या, सर्वांशी सलोख्याने वागा. अहंकाराचा पूर्णपणे त्याग करा आणि कसल्याहि प्रकारचा पंथाभिनिवेश बाळगूं नका, कर्म वितंडवाद म्हणजे पाप होय.

—हातातील कार्य अत्यंत आवडतें असल्यास एखादा महामूर्ख देखील तें पार पाडूं शकतो. परंतु खरा बुद्धिमान तोच कीं जो कोणत्याहि कार्याला असें रूप देऊं शकतो कीं तें त्याच्या अत्यंत आवडीचें होऊन जावें. कोणतेही कार्य क्षुद्र नाहीं हें ध्यानांत ठेवा.

—ज्याने आत्मसंयमाचा अभ्यास केलेला आहे तो बाहेरील कोणत्याहि गोष्टीने विचलित होऊं शकत नाही. तो कुणाचाहि गुलाम बनत नाही. त्याचें मन स्वतंत्र झालेलें असतें आणि केवळ असाच मनुष्य यथार्थ जीवन जगण्यास योग्य असतो.

—कोणत्याहि प्रकारची आसक्ति ठेवूं नका. मेंदूला कार्य करूं द्या किंवा इतरहि कर्में होऊं द्या. अखंड कार्य करीत रहा, पण मनाला कोणत्याहि विकाराच्या आहारीं जाऊं देऊं नका. या जगांत तुम्ही एक प्रवासी आहांत या बुद्धीनें कार्य करा. निरंतर कर्म घडूं द्या, पण बंधनात पडूं नका. ध्यानांत असूं द्या कीं बंधन फार भयंकर असतें.

—ज्या योगें ध्येयमार्गावरील प्रगतींत अडथळा निर्माण होतो वा जें अधःपतनाला कारणीभूत होतें तो दुर्गुण होय, आणि ज्याची उन्नतीसाठी मदत होऊन जो आपल्या विभिन्न वृत्तींमध्यें सुसूत्रता निर्माण करतो तो सद्गुण होय.

—पैसा, नाम, यश किंवा पांडित्य हीं आपल्या उपयोगी पडत नाहींत प्रेमच शेवटीं. आपल्याला हात देत असतें, चारित्र्यच शेवटीं दुस्तर अडचणींचा निराश करून आपल्याला मार्ग काढण्यास मदत करीत असतें.

—आपली चांगली नि वाईट दोन्हीं कर्में विसरून जा आणि त्यांचा पुन्हां कधींहि विचार करूं नका. जें झालें तें झालें, त्याकडे पुन्हां दृष्टी वळवूं नका. भोळसट समजुतीचा त्याग करा. साक्षात् मृत्यू जरी समोर ठाकला तरी भिऊं नका. भूतकालीं केलेल्या कुकर्माबद्दल व्यर्थ चिंता करीत बसूं नका, त्याबद्दल अश्रु ढाळीत बसूं नका. तसेंच आपल्या सत्कर्माचेंहि स्मरण करूं नका.

—चलाखी करून कोणतेंहि मोठें कार्य होत नसतें. प्रेम, सत्य, निष्ठा व प्रचंड शक्ति यांच्या द्वारेंच महान कार्यें सफल होतात म्हणून 'तत् कुरु पौरुषम्" आपलें पौरुष प्रकट करा. आपलें मनुष्यत्व प्रकट करा.

—ईश्वर लाभच साऱ्या धर्मसाधनेचें अंतिम पर्यवसान आणि लक्ष होय. परमेश्वराची सेवा हीच जीवनाला वळण लावणारी सर्वश्रेष्ठ साधना होय.

—धर्म हा एकच आहे. पण या जगांत तो विविधरूपांनी प्रकट होतो आणि हें अपरिहार्य देखील आहे.

—धार्मिक झगडे वा तंटे हे नेहमीं धर्माच्या बाह्यांगावरच होत असतात. जेव्हां खरी धार्मिकता व पवित्रता लोपून अंतरात्मा रूक्ष बनतो तेव्हांच भांडणाचें फावतें, आधी नाही.

—समग्र मानवजातीविषयीं प्रेम आणि उदारता हीच खऱ्या धार्मिकतेची कसोटी होय.

—ज्ञान, भक्ति, योग आणि कर्म या चार मार्गांनी मुक्तिलाभ होतो. यांपैकीं जो ज्याचा स्वाभाविक मार्ग असेल त्याच मार्गानें त्याने जावयास हवें पण तरीहि सध्याच्या काळांत कर्मयोगावर अधिक भर देणे योग्य ठरेल.

—साधना करतां करतां शरीर नष्ट झालें तरी काय हरकत? संतसंगतींत राहतां राहतां धर्मलाभ होतो, कांहीहि अध्ययन न करतां केवळ गुरुकृपेनेंहि शिष्य पंडित होऊं शकतो.

—जिव्हालाल्यानेंच इतर इंद्रियांना पुष्टता व चालना मिळते.

---

# भक्ति व योगासन

लेखकः—हे. घ. कुळकर्णी ध. नेरळ

भक्तियोगसाधना हा सुलभ व सोपा मार्ग आहे. या साधनेंस आवश्यक असणारी सभोवतांलची वातावरणाची बाह्य दृष्टी आणि चित्तमनाची अस्थिरता घालविणारी अंतर्दृष्टी ही अगदी निर्मल असावी लागते. सत्संग व निष्कामतेनें ती साधतां येते. विशेषतः परमार्थासाठीच जर भक्ति उपासना करावयाची तर सत्संग व निष्कामता हींच चित्तवृत्ती निर्मल राखूं शकतात. शिवाय भक्तीची निरनिराळीं अंगें उपांगे अभ्यासून त्यांच्या साह्याने चित्त मनाला भक्तित दंग करीत राहून बुद्धीच्या विकसनानें आपली ध्येय, ध्यान-

धारणा यांची सूक्ष्मतेनें ओळख पटवून घेणे जरूरीचें असतें. परंतु भक्ती जर बाह्य व अंतर मनोरंजनाकडेच लावावयाची म्हटली तर तींत जो क्षणिक विरंगुळा मनाला लाभतो; त्यापेक्षा ती उपासना चित्तवृत्तीवर अधिक परणामकारक होत नाही. उलट मनबुद्धीची स्थिरता त्यामुळें वाढीस लागण्याऐवजी बाह्य उपाधीकडेच लक्ष राहिल्यानें मनाची चंचलता वाढते. ईश्वराची निष्काम भक्ती कितीही अल्प असो, ती जर निर्मल अंतःकरणानें व बाह्य विंवचनरहित केली तर तितक्या प्रमाणांत फल दिल्याशिवाय ईश्वर राहत नाही. कारण ती एक विद्या आहे, आणि विद्येचे ज्ञान विज्ञान विद्येच्या अभ्यासानुसारच मिळावें हा ईश्वरी नियम आहे.

भक्तियोगांत वैकुंठ पदासाठी कांही विशिष्ट विधिप्रकार उपयोजिलेले नाहीत. "देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं असुचा भावो।" या एकाच निष्टेने भक्तियोगी आपला देह सोडतात. परंतु भक्तियोगाने जे योगबल आपोआप अंगी बाणतें त्या योगबलानेच भक्तियोगियांचे मरण त्यांच्या ईश्वर-रूपांत झालेल्या निमग्नतेने त्यांना प्राप्त होतें. अशा उत्कट तन्मयतेंत योगाची श्रेष्ट पायरी जी देह ईश्वररूपांत विलीन करणें ती स्थिति या भक्तीयोयानें मिळविलेल्या संतांची बरीच उदाहरणें आहेत. खास तुकोबा महाराज, गौरांग प्रभू, नृसिंह सरस्वती, आदी बऱ्याच संतांनी ही योगबलाची श्रेष्ठ सिद्धि प्राप्त करून घेतली. सुलभ व सुगम केलेल्या भक्तियोगानें असें श्रेष्ठ स्थान गाठतां येतें.

सारांश, उपासनेच्या मागील वृत्तिपवृत्ति हाच भक्तीचा पाया होय हा पाया जर शुद्ध व दृढ असेल; तर भक्ताची उपासना सुफलदायी झाल्याशिव राहणार नाही. त्यासाठी निग्रह निरोध आणि त्याग यापेक्षा सद्वृत्ति आणि निष्काम कर्म हेच अधिक यशस्वी मार्ग होत.

# जीवनाचा शोध घेणारा महात्मा

लेखकः राष्ट्रपति–व्ही. व्ही. गिरी

सध्यां महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीचें वर्ष चालू आहे. आणि गेल्या१।२ महिन्यापासून आपल्या देशाच्या राजकीय क्षेत्रांत क्रांतिकारक वारे पालट घडून येत आहेत. एक वर्षापूर्वी भारताचें उपराष्ट्रपति पद शोभविणारे व सध्यां राष्ट्रपती पदावर आरूढ झालेले श्री. व्ही.व्ही.गिरी यांनी म. गांधी जन्म शताब्दीच्या संदर्भांत प्रगट केलेले पुढील विचार मननीय वाटल्याशिवाय रहाणार नाहींत.—

—संपादक.

आपल्या प्रिय बापूजींची जन्म शताब्दि आज भारतीय जनतेच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाच्या नि आणीबाणीच्या प्रसंगीं साजरी केली जात आहे. नेमक्या कोणत्या मार्गानें जावें हा मानवापुढील आजचा सर्वांत मोठा प्रश्न आहे. निःस्वार्थ सेवा व सद्वर्तनाचा जो दीप महात्माजीनीं उजळला आहे, त्याच्या प्रकाशांत चिरकालीन शांतता व जागतिक सहयोग हीं शिखरें गांठण्यांसाठीं आजच्या मानवाला वाटचाल करतां येईल.

रसरसलेल्या गुंतागुंतीची धूळ सांचलेल्या भूमींत गांधीजीनीं नवजीवन आणलें. शतकानुशतकांच्या सुस्थितींतून त्यानी भारताला जागें केलें. भारतीय

लोकजीवनांत ते शिरले, मिसळून गेले ते इतके कीं त्यांच्या जीवनाचा तो एक भागच बनला. समाजांतील अगदीं खालच्या थरांतील लोकजीवनाबद्दल गांधीजींचें विचार सामुहिक प्रश्न, त्यांची जाणीव निर्माण करण्याची त्यांची निष्ठा व चिरकाल टिकण्याची मनाची शांति, या त्यांच्या गुणांचा सर्वांवर प्रभाव पडला आहे.

विविध आणि वैचित्र्यपूर्ण वारसा असलेल्या या देशांत सुरू झालेल्या लढ्याला त्यांनीं जें मार्गदर्शन केलें नि वळण लाविलें त्याचा विचार करतां सुसंस्कृत मानवाच्या इतिहासांतील हे एकमेव उदाहरण आहे. गांधीजी भारताचे खरेखुरे प्रतिनिधि होते आणि त्यांनी इतर कोणापेक्षांहि अधिक स्पष्ट व दूरवरचा विचार केला होता. भारतीय इतिहासांतील कांहीं थोड्या व्यक्तींप्रमाणेच गांधी म्हणजे भारतीय भूमीच्या खऱ्याखुऱ्या भारतीयत्वाचे मूर्तिमंत उदारण होते; अगाध भूतकाळ व सुदूर भविष्यकाळ यांमध्यें वावरत असल्याचा भास प्रत्येकाला भारतांत होईल. महात्मा गांधी हेच या दोहोंमधील दुवा आहेत असें मॅक्समुल्लरनी म्हटलें आहे.

पन्नास वर्षांहून अधिक वर्षें बापूजींनी आमच्या जीवनावर प्रभाव पाडला असून राष्ट्राच्या भवितव्याच्या मार्गदर्शनांत त्यांचे जीवन यापुढेहि मार्गदर्शक ठरेल. गांधीजींच्या तत्वप्रणालीची कांस संबंध जग केव्हांना केव्हां तरी धरीलच असें वाटण्या इतकी ती आशावादी आहें.

गांधीजींच्या शिकवणींतील मर्म व मूलभूत कल्पनांचा विचार करण्याची आज सर्वांत अधिक आवश्यकता निर्माण झाली आहे. शैक्षणिक संस्थांतील आमचे विद्यार्थी व इतर क्षेत्रांतील अन्य लोक यांनी राष्ट्राच्या विकासांत विधायक कार्य करण्यासाठी तसेंच स्वतःच्या जीवनाचा अर्थ व उद्दिष्ट जाणून घेण्यासाठी बापूंच्या शिकवणुकीचा विचार व मनन करण्याची वेळ आज आली आहे, असें मला वाटते.

जेव्हा पाप वाढते, तेव्हां राष्ट्रे एकमेकांवर अन्याय व कुरघोडी करू लागतात

जेव्हा हिंसा व रक्तपात ही नित्याचीच गोष्ट होते तेव्हां महात्म्याचा जन्म होतो असा समज किंवा कल्पना जगांत सर्वत्र आहे. हा महात्मा मार्गदर्शन करून जीवनांत शांति आणतो आणि गांजलेल्या लोकांना मार्गदर्शन करतो, गरीबांचे अश्रु पुसतो. गांधीजीहि असेच एक महात्मे व तारक होते.

गांधीजींनी जी जी गोष्ट हाती घेतली त्यामुळे तिची प्रतिष्ठा वाढली. सामाजिक जीवन एकसंघ बाब आहे असें गांधीजी म्हणत व त्यांच्या प्रत्येक गतिमान व्यक्तित्वाचा खोल ठसा सामाजिक जीवनाच्या प्रत्येक अंगावर उमटला आहे. साहजिक जीवनाच्या ज्या ज्या क्षेत्रांत गांधीजींनी कार्य केले त्या कार्याचा पाया मानवता हा होता व त्याला दैवी गुणाचीहि जोड मिळाली होती. असें एका लेखकाने म्हटले आहे. यामध्ये गांधीवादाचे सार आहे. गांधीजींचा दृष्टिकोन आर्थिक मुक्तता, व्यक्तिमात्राचें नैतिक संवर्धन आणि आत्मिक बलोपासना हे गांधीजींच्या जीवन कार्याचे आधारस्तंभ आहेत. प्रेम हे द्वेषापेक्षां श्रेष्ठ, युद्धापेक्षां शांतता फलदायी, संघर्षापेक्षां सहकार उत्तम व जबरदस्तीपेक्षां मन वळविणे आधिक चांगले या नीतितत्वांची बापूजींनी आपणाला वारंवार आठवण करून दिली आहे.

बापूंनी जीवनविषयक पद्धतशीर तत्वज्ञान तयार केले. त्यानी आपल्या आयुष्यांत सत्याचे अनेक प्रयोग केले. आपले जीवन हाच आपला संदेश असल्याचे त्यांनी एकदा म्हटले होते. सत्य अहिंसा आणि लोकशाही हा गांधीजींच्या तत्वज्ञानाचा पाया आहे. सर्वांच्या कल्याणासाठी या तत्वांचा उपयोग करतां येईल. म्हणजेच सर्वांचे कल्याण या तत्वाच्या आचरणात आहे.

गांधीजी केवळ राजकीय कृती-कुशल नव्हते तर साधी, सोपी ओघवती व अर्थगर्भ भाषा ते सहज लीलेने लिहीत. गांधीजीच्या सर्वस्पर्शी लेखणीने लिहिलेले अनेक विषयांवरील साहित्य व गांधीजीचे विविध विषयाबरील विचार, गांधीजीचे लेख व भाषणे आज उपलबध झाली आहेत.

बापू हे केवळ ध्येयांवर नव्हे तर मानवावर प्रेम करणारे खरे खुरे मानव प्रेमी होते. वरील मूलभूत तत्वांबावत त्यांची खात्री पटली होती तरीहि त्यानी उपयुक्तता व खरेखोटेपणा पडताळण्यासाठी त्याबाबत अनेक प्रयोग केलें. प्रयोग करण्यासाठी त्यांनी स्वतःची आणि सहकाऱ्याचीच प्रयोग शाळा बनविली. याबाबत नई तालिम किंवा नव शिक्षणाबाबतचे त्यांचे प्रयोग व त्याबाबतचें त्यांचें विचार यांचा विशेष उल्लेख करतां येईल. स्वावलंबन हा या नवशिक्षणाचा मूलाधार आहे. स्वतःच्या निढळाच्या घामानें मीठ-भाकर मिळवितां यावी म्हणून नेहमीच्या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना हस्तकलेचे किंवा तसल्याच एकाद्या धंदेउद्योगाचे शिक्षण दिले पाहिजे असे त्यांना वाटे. मीठ-भाकरीसाठी परिश्रम हे गांधीवादाचे सार आहे. हें तत्व हा गांधीवादाचा मूलाधार आहे.

मानवी जीवनाचे किंवा कार्यकक्षेचे असें एकही अंग नाही की, ज्यावर महात्माजींच्या व्यक्तित्वाचा ठसा उमटला नाही. मग तो प्रश्न आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, किंवा सांस्कृतिक असो. मानवानी सामाजिक आणि सर्वसमावेशक व्हावें, त्यामध्ये ईश्वराने निर्माण केलेल्या सर्वांना स्थान असावें मानवी जीवनाचा त्यांनी एकसंध जीवन म्हणून विचार केला.

गांधीजीमध्ये मुत्सद्दी, रातकारणी, समाजसुधारक, वक्ते, लेखक, शिक्षक मानवतावादी, कॉस्मॉपालीटन सत्यान्वेषक ऋषी, संत आणि द्रष्टा या सर्वांचा सुरेख संगम झाला होता. आपणाला जे पटले आहे ते सांगण्याचे अलौकिक धैर्य त्यांचेपाशी होते. सदसद्विवेक बुद्धीला स्मरूनच ते वागत. सत्याच्या या सच्च्या सेवकाने, या सत्यान्वेषकाने त्यासाठी जगाशी एकाकी व निर्भयतेने लढा दिला. २५ वर्षाच्या अहिंसात्मक चळवळीनंतर गांधीजींनी आम्हाला राजकीय स्वातंत्र्य मिळवून दिले. ज्या तत्वांचे किंवा ध्येयाचे स्वतःला पालन करतां येत नाही ती तत्वें किंवा ध्येये त्यांनी राष्ट्रापुढे ठेवली नाहीत. आधी केले मग सांगितले हे त्यांचे ब्रीद होते. त्यांच्या यशाचे हेच रहस्य आहे.

मानवतेसमोरील प्रश्न हेरण्याचे अलौकिक सामर्थ्य व त्यांची उकल करण्यासाठी कल्पक उपाय शोधण्याची दिव्य शक्ति बापूच्या ठायी होती. त्यांची सर्वसाधारण बुद्धि असाधारण स्वरूपाची होती. दीर्घकालीन वास्तवता व मूलभूत

तत्वें राज्यकीयदृष्ट्या शक्य व्हावींत म्हणून त्यांनी निकरानें लढा दिला. दक्षिण आफ्रिकेतील त्यांच्या कार्याचा पाया याच वास्तवतेनें व तत्वांनी घातला. तेथें त्यांनी सत्याग्रहाचे रोपटे लावले. सत्याग्रहाचा अभिनव प्रयोग केला. या प्रयोगातून भावी भारतीय नेत्याला आपला देश स्वतंत्र करण्यासाठी प्रशिक्षण मिळालें. या प्रक्रियेत गांधीजीनी आपणाला अत्यंत महत्वाच्या गोष्टी शिकविल्या. भय आणि द्वेष यांचा त्याग करून जनतेमध्ये समानता आणि भ्रातृभावाची भावना निर्माण करण्याचे शिक्षण त्यांनी अनुयायांना दिले. समाजातील पददलित हरिजन यांची प्रतिष्ठा त्यांनी वाढविली. आज त्यांना कायद्यानें आणि प्रत्यक्षांत समान दर्जा व इतरांबरोबर समान सामाजिक प्रतिष्ठा लाभली आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधींची व माझी पहिली भेट १९१४ साली इंग्लंड-मध्यें झाल्यापासून त्यांच्या आत्यंतिक प्रामाणिकपणाची, प्रच्छन्न स्पष्टवक्ते-पणाची, दूरदृष्टीची, सामाजिक सेवेच्या तळमळीची आणि त्यांच्या उत्साही वृतीची माझ्या मनावर छाप पडली आहे. रेड क्रास चळवळीच्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो. शांततेसाठी तळमळ, सदिच्छा, भूतदया आणि संकटग्रस्तांना सतत साह्य करण्याची तळमळ या रेडक्रॉसच्या ध्येयाचा गांधीजी मला मूर्तिमत पुतळा वाटला.

# मनांत आलें कीं—

ले.:-द. शं. टिपणीस

( सप्टेंबरच्या अंकावरून पुढें चालू )

## ५) ट्रॅन्झीस्टर.

ट्रॅन्झीस्टर व रेडिओ यांत अधिक चांगला कोणता ? उत्तर जरा कठी-णच आहे नाहीं का ? आपली आवड म्हणजे ? अगदीं त्या सारखेच ट्रॅन्झीस्टर व रेडिओ दोघांचें कार्य एकच पण ट्रॅन्झीस्टर मध्यें रेडिओ पेक्षां अधिक काहीं आकर्षक गोष्टी आहेत. दोघांनाही सारखी बडबड करण्याची संवय आहे हें खरें. तरी दोघांत फरकही आहेत. ट्रॅन्झीस्टर स्थिर आहे. प्रवासाची त्याला भारी आवड आहे. जातां येतां वाटेंत चालत बोलत राहण्याची त्याला संवय आहे. कानगोष्टी करणें त्याला आवडते. रेडियोला या गोष्टी करतां येत नाहीं. तो स्थिर आहे. एका ठिकाणीं बसून त्याला काय सांगाचें तें शांतपणे सांगती ट्रॅन्झीस्टर प्रमाणें कडेवर बसून बडबड करीत गांव-भर फिरत नाही. कांहीं ऐकायचें असेल तर रेडिओकडे तुम्हाला गेलें पाहिजे. ट्रॅन्झीस्टर तुम्ही असाल तेथें तुमच्या जवळ येऊन बसायला तयार असतो. पण या सर्वांपेक्षां एक मोठा फरक या दोघांत आहे व तो म्हणजे त्यांच्या जीवनाच्या शक्ति पुरवठ्यांत ट्रॅन्झीस्टर च्या जीवनाचा साठा आंतच असतो तर रेडिओचें जीवन बाहेरून आंत घेतलें जातें ट्रॅन्झीस्टरच्या जीवनाचा साठा एकदां भरुन ठेवला असतो व वापरल्यानें तो क्षीण होत जातो. व शेवटीं बंद पडतो. मग पुन्हां साठा भरावा लागतो. रेडिओला जीवनाचा पुरवठा बाहेरून होत असल्यामुळें व बाहेरील साठा अक्षय असल्यामुळें ट्रॅन्झीस्टरप्रमाणें जीवन संपुष्टांत येण्याचा त्याला धोका नसतो.

कारण त्याच्या अंतर्गत यंत्रणेचें कनेक्शन बाहेरच्या अक्षय शक्तीशीं असतें
मानवी जीवनही असेंच आहे. बहुसंख्य मानव हे ट्रॅन्झिस्टरप्रमाणें आहेत
जन्मतात तेव्हां जीवन शक्तीचा ठरावीक साठा घेऊन ते येतात. तो आहे
तोंपर्यंत हसतात खेळतात फिरतात मजा करतात पण जसजसा काळ जातो
तसतसा हा साठा वापरामुळें क्षीण होत जातो व तो संपला कीं सर्व यंत्रणा
बंद पडते. पण जे रेडिओ असतात, संत असतात त्यांचें मन ट्रॅन्झिस्टरप्रमाणें
अस्थिर असत नाहीं. तें स्थिर असतें. त्यांच्या अंतर्गत जीवनसाठ्याचें
आत्म्याचें कनेक्शन विश्वात्म्याशीं असल्यामुळे जीवनशक्तीचा अक्षय पुरवठा
होत असतो. म्हणून जीवनशक्तीसंपून यंत्रणा बंद पडण्याचा त्यांना धोका
नसतो. आतां सर्व यंत्रणाच जुनी झाली तर गोष्ट निराळी. उपयोगाच्या दृष्टीनें
ट्रॅन्झिस्टर कितीही चांगला असला तरी जीवनाच्या दृष्टीनें रेडिओ अधिक
चांगला होय. कारण त्याचें जीवन अक्षय्य असते. ट्रॅन्झीस्टरला इलिमिनेटर
लावून त्यालाही रेडिओप्रमाणें जीवनाचाचा अक्षय्य पुरवठा करण्याची हल्लीं
सोय झाली आहे. भक्तीचा इलिमिनेटर लावून प्रत्येकाला आपल्या आत्म्याचें
कनेक्शन विश्वात्म्याशीं देऊन अक्षय जीवनाचा लाभ घेण्याची सोय अध्या
त्म्यांत केली आहे. त्याचा फायदा प्रत्येक व्यक्तीनें घेणें चांगलें नव्हे काय ?

## प्रमेय व त्याचा व्यत्यास.

स्वच्छ पाण्याने भरलेली बालदी. ती ती भरली कशी ? कणाकणांचा थेंब
बनतो. थेंबा थेंबांची धार होते. धारे धारेनें बालदी भरते. भरलेल्या बालदींत
धार आहे, थेंब आहेत, थेंबांतील कणनकण आहे. तींतील थेंबभर पाणी
निराळे काढले तर त्या थेंबांत बालदीभर पाणी येईल काय ? कण, अणू, परम
माणू वा अधिक सूक्ष्मतर भाग मिळून दृश्य वस्तू होते. वस्तूंत कण आहेत पण
अलग केलेल्या एका कणांत ती वस्तू असेल काय ? अनेक दृश्य वस्तू मिळून
ही सृष्टी होते. अनेक सृष्टी मिळून ब्रह्मांड होते. ब्रह्मांडात हें सर्व आहे. पण
त्यांतील एका वस्तूंत ब्रह्मांड मात्र मिळणार नाहीं. दुधांत लोणी असेल म्हणून
कांहीं लोण्यांत दूध मिळणार नाहीं. ब्रह्मांडांत सर्व वस्तूंचा समावेश होतो खरा
म्हणून कांहीं प्रत्येक वस्तूंत ब्रह्मांड मिळणार नाहीं. विश्वशक्तीच्या ठिकाणीं सर्व
प्राणि मात्रांची शक्ती आहे. विश्वात्म्यांत सर्व प्राणीमात्रांचा आत्मा आहे. पण

प्राणिमात्राच्या प्रत्येक आत्म्यांत विश्वात्मा नाहीं. कारण तो विश्वात्म्यापासून निराळा झाला आहे. भगवान गीतेंत जें म्हणाले "माझ्या ठिकाणीं सर्व आहे.पण सर्वांच्या ठिकाणीं मी नाहीं" त्याचा अर्थ हाच. प्रमेय खरें आहे पण व्यत्यास खरा नाहीं. सूर्यापासून अलग झालेल्या चंद्राला सूर्याचें तेज कसें असणार? तें पाहिजे तर चंद्रानें सूर्यांत मिसळून गेलें पहिजे. मोक्ष पाहिजे तर आपला आत्मा विश्वात्म्यांत मिसळून गेला पाहिजे. जीव व शिव समरस झाले पाहिजेत. असें घडवून आणणे हेंच मानवी जीवनाचें अंतीम ध्येय आहे.

## चंद्रावर स्वारी

चंद्राच्या स्वारींत मानवानें एक मोठा टप्पा गाठला. मानव चंद्रावर पाऊल ठेवूं शकला. मानवी बुद्धीनें मिळविलेला हा एक मोठा विजय आहे. शास्त्रज्ञांच्या या विजयामधून मानवी प्रगतीला पोषक असें कांहीं निष्पन्न व्हायचें असेल तें होईल. पण सर्व साधारण माणसाला या घटनेंत कांही विशेष रस वाटतो असें दिसत नाहीं. अल्पबुद्धीच्या या मानवाला प्रश्न पडतो तो हा कीं यामुळें पृथ्वीवरील मानवाचा कोणता फायदा होणार आहे. मानवाच्या हालअपेष्टा कमी होतील, कीं महागाई ओसरेल कीं पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळेल ? जातील चंद्रावर आणखी कांहीं अमेरिकन्स्, मागोमाग कदाचित् कांही रशियन्स, विसाव्या शतकांतील पृथ्वीवरील मानव हें 'आधीं होता वाघ्या, मग झाला पाग्या, तरी मूळ स्वभाव जाईना.' या उक्तीप्रमाणें हे लोक तिथें गेल्यावरही राजकारणाचा बुद्धिबळाचा डाव खेळूं लागतील व त्यांच्या कुस्तीमुळें पृथ्वीवरील गरिबांचा चुराडा होईल. आणखी एक पानपत निर्माण होण्याचें भय मात्र लोकांना वाटतय. अब्जावधी रुपये खर्च करून मोबदल्यांत मानवी विनाश पदरांत पडण्याचा संभव आहे. शास्त्रज्ञांनीं सुखाचें अमृत म्हणून शोध लावावेत व राजकीय मुत्सद्यांनीं त्यांचें रूपांतर करावे असेंच घडत आलेले आहे. यामुळें सर्वसाधारण जनतेला आज तरी या गोष्टीचे फारसें सुख दुःख वाटत नाहीं. लाख सुधारणा झाल्या पण त्या करणाऱ्या मानवांत जर सुधारणा झाली नाहीं, त्याची वृत्ति कु-धारणा राहिली तर मग या सर्व खटाटोपापासून मानवी कल्याण काय साधले असा प्रश्न निर्माण होईल. तो न झाला तर मग मात्र शास्त्रज्ञांनीं खरा खुरा विजय मिळविला असें म्हणतां येईल. तोंपर्यंत या

सर्वांमागे गूढता व संशयाची पार्श्वभूमि राहील व त्यामुळें सर्वसाधारण माणूस कौतुक करण्यापलीकडे त्यांत अधिक रस घेणार नाहीं. आम्हाला त्याचें काय होय ? ही सामान्य माणसाची प्रतिक्रिया. असें असलें तरी सामान्य माणसाला शिकण्यासारखें यांत पुष्कळ आहे.

## मिशा ओढणारें बाळ.

चंद्रासंबंधीं जें कांहीं घडतंय ते पाहिल्यावर मानवी बुद्धीचें कौतुक करावेसे वाटतें. ब्रह्मदेवानें ही सृष्टी व तींत मानव निर्माण केला. त्यानें मानवाला बुद्धि दिली. मानव म्हणजे ब्रह्मदेवाचे लाडके बाळ. म्हणून मानवाला ही देणगी त्याच्याकडून मिळाली. वडिलांच्या मांडीवर खेळता खेळता मानवानें आपली ही देणगी इतकी तेजस्वी, अफाट व सामर्थ्यवान केली कीं तिच्या जोरावर हें बाळ बाबांच्या मिशा ओढूं लागले आहे. आपल्या बाळानें आपल्या मिशा ओढल्या तर कोणत्या वडिलाना राग येईल ? उलट कौतुकच वाटेल. या बाळांत हें सामर्थ्य कोठून आलें ? बुद्धीमुळें. प्रयत्नानें मानव आपली बुद्धि प्रतिभावान सामर्थ्यशाली व प्रखर करूं शकतो ही गोष्ट ध्यानीं घेऊन प्रत्येकाने तर्कशुद्ध पद्धतीनें स्वतंत्र विचार करण्याची संवय स्वतःस लावून घेतली तर बुद्धीचें सामर्थ्य हळू हळू प्रगट होऊं लागेल. या बुद्धिच्या साह्यानें मानवाने चित् आकाशांतील सूर्यचंद्रावर स्वारी केली व त्यांत त्याला यश आले तर त्याचें सामर्थ्य सहस्रपट वाढेल व मानव जात खऱ्या अर्थाने सुखी होईल. यासाठीं लागणारी चिकाटी, दृढ निश्चय, धैर्य, मृत्यूला कः पदार्थ मानण्याची वृत्ति वगैरे गोष्टी, आपले दैनंदिन व्यवहार करतांना हळू हळू कमिविण्याकडे मनाचा कल सतत ठेवण्याचा प्रयत्न करावा. पूर्वीं शास्त्रज्ञांनीं लावलेल्या शोधांचा उपयोग मानवी संहाराकडे फारसा न करतां ऐहिक सुख वाढविण्याकडे केला गेला. पण आज दुसऱ्या महायुद्धापासून मात्र शास्त्रज्ञांच्या शोधाचा उपयोग मानवी संहार करण्याकडे केला जात आहे. ॲटमचा शोध लागल्या ॲटम बाँम, हायड्रोजन बाँब क्षेपणास्त्र अशी विषारी, संहारक व भयंकर शस्त्रे शोधून काढण्यांत मानवी बुद्धि खर्च होत आहे. मानवी बुद्धि विशाल होत आहे. पण मानवी अंतःकरण संकुचित होत आहे. बुद्धीबरोबर मन विशाल न झाल्यामुळें एक बैल भला मोठा धिप्पाड व दणकट व दुसरा खुजा व पातळ

असलेल्या गाडीप्रमाणें आधुनिक प्रगतीचें हें गाडे ओढत ताणत चालले आहे. यामुळें सर्व मानवजात विशेषतः राज्यकर्ते भीतिग्रस्त स्थितींत वावरत आहेत. हे शास्त्रीय शोध म्हणजे जगाच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. बुद्धीबरोबर अंतःकरणही विशाल व शुद्ध झालें तर जग निर्भय होईल. पण आज तरी ही वाढ एकांगी होत आहे. खूप सुधारणा होऊन ही जगांतील सामान्य मानवाला हाल अपेष्टा काढाव्या लागत आहेत त्या आहेतच.

## ५५ पुराणांतील वांगी

कथा, कादंबऱ्या, निबंध, काव्य वगैरे प्रकारांत आपण साहित्य विभागतो. हजारों वर्षां पूर्वी अशी प्रथा नसावी असें वाटते. त्यावेळचे वाङ्मय म्हणजे धार्मिक वाङ्मय, त्यांत सर्व प्रकार येई. बायबलमध्यें जीवन तत्वज्ञान आहे तशा रूपक कथाही आहेत. आपल्या धार्मिक वाङ्मयांत कथा रूपके, संवाद, आख्यानें यांत अध्यात्मिक तत्वज्ञान गुंफून लोकांना जीवनाचें मार्गदर्शन केलेलें आढळेल. कडु औषधाच्या गोळीला साखर लावून दिल्यानें लहान बालक ती गोड लागते म्हणून सहज गिळते व त्याबरोबर तें कडू औषधही त्यांच्या गळी उतरते. या युक्तीचा उपयोग पुराणांनीं केला आहे. आज कालची शिकली संवरलेली मंडळी कोरड्या तत्वज्ञानाच्या थाऱ्याला उभे राहण्यास तयार नाहींत. तशा प्रकारचें एखादें मासिक वा पुस्तक चुकून हाताला लागलें तर नांव वाचल्याबरोबर विंचू डसल्यागत हात झटकून तें बाजूला टाकून देतात. कथा, कादंबऱ्या, नाटके यांवर मात्र ही मंडळी मुंगळ्यासारखी तुटून पडतात. ही आजच्या सुशिक्षितांची मनःस्थिती. मग हजारों वर्षांपूर्वीच्या आडमुठ्या व अशिक्षत मानवाच्या बुद्धीची पातळी किती खाली असेल, अशा मानवाला शुष्कतत्त्वज्ञानांत किती गोडी वाटत असेल व असें तत्त्वज्ञान त्यांच्या डोक्यावरून कसे पलीकडे जात असेल हें लक्षांत घेतल्यावर त्यावेळच्या पंडितांनीं व शहाण्यासुरत्या लोकांनी जीवनांतील चांगल्या गोष्टी अशा लोकांच्या गळी उतरविण्यासाठीं कथा आख्यानांची साखर वापरली तर त्यांत त्यांचा मानवी स्वभाव ओळखण्याचा शहाणपणाच दिसत नाहीं काय ? इसापनीतींतील रूपकांना आम्ही हंसत नाहीं. त्यांतील गाढव माणसाप्रमाणे बोलतो हें आपण कौतुकानें ( गोष्टी पुरते ) खरें धरून चालतो व त्या गोष्टींत गुंफलेल्या नीतितत्त्वाचा रस घेतो.

मग पुराणांतील गोष्टींची भाकड कथा म्हणून चेष्टा मस्करी आजच्या प्रगल्भ विचाराच्या सुशिक्षित मानवांनी कां करावी ? पुराणांतील वांगी पुराणांत ठेवण्याचा उपदेश करण्यापेक्षां वांग्या भोंवतालचा मालमसाला बाजूला सारून आंतील गाभ्याचा, जीवनसत्त्वाचा—रस चाखला तर अधिक चांगले नव्हे काय ? बुद्धिमंत माणसाला हें करतां येणार नाहीं काय ? इतरांनाही ते चाखवू शकणार नाहींत काय ?

## पी हळद, हो गोरी.

कांहीं झाडांना फळें लौकर येतात. कांहींना उशीरां येतात. केळ लौकर फळास येते. आंब्याला फळ येण्यास कांहीं वर्षें लागतात तर नारळाच्या झाडाला नारळ येण्यास २०–२५ वर्षे लागतात. कोणत्याही गोष्टीच्या वाढीला जितका अधिक काल तितकें तिचें पुढील जीवन अधिक टिकावू होतें. हा निसर्गाचा नियम आहे. आंब्याचे झाड खूप टिकतें तर नारळाचें झाड त्याच्याही पेक्षां जास्त टिकतें. भाजीपाला लौकर पूर्णत्वास येतो पण सुकतोही तितक्याच लौकर. कुत्री, मांजरी लौकर फळास येतात व पिलें थोड्या अवधींत पूर्णत्वास जातात. पण त्यांचे पुढील आयुष्यही लौकर संपुष्टांत येते. मानवाला जन्मास येण्यास नऊ महिने लागतात व त्याची मानसिक व शारीरिक वाढ पूर्ण होण्यास २०-२२ वर्षे लागतात. पण तो आपल्या आयुष्याची शताब्दि साजरी करूं शकतो. प्राथमिक शाळांतील परीक्षा अल्प श्रमांत भराभर देतां येतात पण महाविद्यालयाच्या परीक्षा पास व्हायला भरपूर श्रम व कालावधी लागतो. शेवटचें टोक गाठावयाला बराच कालावधी लागतो खरा पण त्याचें मूल्यही तितके अधिक असतें. चुटकी सारखा कोणी पी. एच्. डी. अगर तत्सम उच्च परीक्षा पास झाला आहे काय ? Rome was not built in a day. चांगल्या गोष्टी, श्रेष्ठ प्रगति होण्यास भरपूर श्रम व काल लागतो. जादू सारख्या त्या कांहीं क्षणार्धांत निर्माण होत नाहींत. जेवढे जास्त श्रम व अधिक काल तेवढें यशाचें मूल्यही अधिक म्हणून आपल्या एकाद्या कामाचे फळ मिळण्यास वेळ लागला तर गांगरून जाऊं नये, अधीर होऊन निराश होऊं नये. धीरानें वाट पहावी. बी लावलें कीं त्याला मुळें आलीं कीं नाहीं हें तें रोज उपटून पहाण्याचा बालिशपणा जीवनांतील व्यवहारांत करूं नये. पी हळद हो गोरी

असला घायकुतपणा निसर्गाला मान्य नाहीं. भरपूर श्रम व भरपूर धीर ही यशाची गुरु किल्ली आहे.

## नशीबाचा फेरा S. S. C.

पावसाळ्यांत नदीनाल्यांना पूर येतो. मोठ्या नद्यातून पाण्याचें लोंढेच्या लोंढे वाहत असतात. जें कांहीं मिळेल तें घेऊन बेफामपणे धावत असतात. नदींत भोंवरे असतात. ते गरागरा फिरतात. जे तडाक्यांत येईल त्यालाही आपल्या बरोबर फिरवीत राहातात. ती वस्तू मागे जात नाहीं कारण तिला तसें जातां येत नाहीं व पुढें ही जात नाही कारण भोंवऱ्याच्या चक्रा तिला जाऊं देत नाहीं. पण तेवढ्यांत एखादा मोठा लोंढा आला तर त्यातील कांहीं वस्तू कशाला तरी अडकून पडून राहतात. पुष्कळशा लहान मोठ्या वस्तू पाण्याच्या जोरानें पुढें निघून जात असतात. त्यांतील कांहीं बरेच पुढें गेल्यावर अडकून पडतात व बाकीच्या पुढें निसटून जातात. सुरवातीला निघालेल्या कित्येक वस्तू अशा अडकून पडतात पण त्यांतल्या किती नंतर पुढें जातात याचा कांहीं कोणी हिशोब करीत नाहीं. त्याचें पुढें काय झालें याचा कोणास पत्ता नसतो. कदाचित त्यांतील कांहीं वर्ष भर तशाच पडून पुढील पुरामध्यें पुढें निघून जात असतील व कांहीं नद्यांना वर्षातून दोनदां पूर येतो. एक उन्हाळी व एक पावसाळी. S.S.C तरी काय मोठ्या नदी सारखीच आहे, हिला ही वर्ष्यातून दोनदा पूर येतात, मोठा उन्हाळ्यांत व छोटा पावसाळ्यानंतर, दिवसें दिवस ही नदी अफाट होत चालली आहे वर्षातून दोनदा येणारे बाढते लोंढे पाहून अधिकारी बर्ग गांगरून गेला आहे, नदींतील लोंढयामुळें अनेक जण पुढें निसटून जातात पण कित्येक नशिबाच्या भोंवऱ्यांत अडकून तेथेंच गरगर फिरत राहतात. सुदैवानें ग्रेसचा वारा लागलाच तर तेवढ्यांत कांहीं पुढें ढकलून जातात, कित्येक थकल्यामुळें अडकून पडतात. परीक्षा येते जाते हे जेथें पडले तेथेंच, त्यांचें पुढें काय झालें याचा कोणालाही पत्ता नसतो. अलिकडे मात्र नदीच्या पात्राला लहान मोठे कालवे काढून (व्यावसायिक शिक्षण) अशा विद्यार्थ्यांना पुढें जाण्यास मार्ग खुलाकरून देण्याचा स्तुत्य उपक्रम चालू आहे. नशीब वाचपायला तेवढाच आधार. चांगलें आहे. कांहीं वाईट नाहीं. पण नदीच्या पात्रांतून वा कालव्यांतूनही जे पुढें जाऊं शकत नाहींत त्यांचें नंतर काय होते याची कोणी दखल घेत नाहीं. पुन्हां सुरवातीला

ज्यांनीं उड्या घेतल्या त्यांतील किती पैलथडी गेले याच. कोणी कधींच हिशेब केला नाहीं. दुसरें असें कीं सुरवातीला जी रत्ने चमकली ती पुढें अधिक तेजाळली कीं त्या रत्नाचें कोळसे झाले हें तरी कोण जाणतो ? समजा सगळा हिशोब केलाच तर लाखाचे बारा हजार होण्याचा संभव अधिक. किती मानवी जीवन व शक्ती वाऱ्यावरी उडून जात असते देव जाणे.

---

# पोच व परिचय

## गीतार्थ दर्शन

**लेखक**—तु. ग. चव्हाण ॲडव्होकेट,

प्रकाशक—श्रीमती चंद्राबाई नायर किं. दीड रुपया.

हा गीतेचा मराठी काव्यानुवाद आहे. मराठींत आजवर गीतेचे काव्यनुवाद अनेकांनीं केले आहेत. प्रत्येकाचें कांहीं ना कांहीं वैशिष्टय असतें. गीतेचे काव्यानुवाद करण्याची स्फूर्ति असंख्य लोकांना व्हावी असें तिचें असामान्य महत्त्व आहे. ॲडव्होकेट चव्हाण यांचा हा काव्यमधुर अनुवाद स्वयंस्फूर्त आहे. याचें प्रकाशन उपकुल गुरू डॉ. गजेंद्रगडकर यांच्या हस्तें झालें. ते म्हणतात हा अनुवाद सरळ साधा, सुटसुटीत सुरस, गोड, मधुर, रसाळ व प्रासादिक आहे." या अनुवादास सुरसपणाचीं जितकीं विशेषणें लावतां येतील तीं सारीं त्यानीं बहाल केलीं आहेत. त्यावरून हा अनुवाद किती सुरस व सुबोध आहे याची सहज कल्पना करतां येणार आहे.

❀

# श्रीराम हेंच सर्वस्व

## सुलभ वेदान्त

—श्रीगोंदवलेकर महाराज

### शरणागती

[ आपण रामार्पण झाल्यावांचून अनुसंधान साधत नाहीं. रामार्पण होण्यास शरणागत व्हावें. आपलें कर्तेपण शरणागतीच्या आड येतें. राम कृपेची साक्षात् मूर्ति असल्यानें त्याच्याशीं अनन्य व्हायला शिकावें. त्यानें दिलेल्या परिस्थितींत समाधान मानावें. हाच शरणागतीचा मार्ग होय. ]

१ आतां ऐका माझें वचन । मनानें व्हावें रामार्पण ॥
२ माझें नातें गोतें एक राम । हा भाव ठेवून जावें रामास शरण ॥
३ अनन्य व्हावें भगवंतीं । जो कृपेची साक्षात् मूर्ति ॥
४ रामा आतां करणें नाहीं उरलें जाण । तुला आलों मी अनन्य शरण ॥
५ ऐसी ठेवा मनाची ठेवण । कृपा करील रघुनंदन ।
६ आतां याहूनि दूजें लिहिणें कांहीं । सत्य सत्य उरलें नाहीं ॥
७ आनंदरूप परमात्मा जाणा । त्यासी व्हावें अनन्य शरण ॥
८ आपलें कर्तेपण टाकावें । म्हणजे रामाला शरण जातां येतें ॥
९ ज्यानें धरले भगवंताचे पाय । तोच त्याला झाला उपाय ॥
१० मी आतां झालों रामाचा । त्याला अर्पावी सर्व चिंता ॥
११ मी ज्याचा झालों त्याला माझी काळजी । हा ठेवावा भाव चित्तीं ॥
१२ माझें हित तो जाणे । हें जाणूनि स्वस्थचि राहाणें ॥
१३ विषयवासना सुटण्यास उपाय जाण । आपण जावें रामास शरण ॥
१४ जें जें करणें आपले हातीं । तें करून न झाली शांति ।
आतां शरण जावें पद्मुरती ।

१५ जावें रघुनाथास शरण । तोच दुःख करील निवारण ॥
१६ एक राम माझा धनी । त्याहूनि दुजें आपुलें न आणीं मनीं ॥
१७ अभिमानरहित जावें रामाला शरण ।
त्यानेंच राम होईल आपला जाण ॥

१८ आतां जगांत माझें नाहीं कोणी । एका प्रभु रामावांचुनी ॥
१९ निर्धार ठेवा मनीं । शरण जावें राघवचरणीं ॥
२० जें जें केलें आजवर आपण । तें तें रामासी करावें अर्पण ॥
२१ जें जें होतें तें राम करी । तेंच स्वभावें होय हितकरी ॥
२२ म्हणून जी स्थिती रामानें दिली । ती मानावी आपण भली ॥
२३ गंगेच्या प्रवाहांत पडले । गंगा नेईल तिकडे गेले ।
गंगा जाते योग्य ठिकाणीं । याचे जाणें सहजासहजीं ॥

२४ तैसें असावें भगवताचे स्मरणांत । राम ठेवील त्यांत मानावें हित ।
२५ सर्व जगत ज्यानें जाणलें मिथ्या । हें जाणून शरण जावें रघुनाथा ॥
२६ कारण परमात्म्याला जाणें शरण । याहून दुजा मार्ग न उरला जाण॥
२७ धन्य तो व्यवहारिक जाण । जेणें केलें रामास स्वतःला अर्पण ॥
२८ सर्वस्वीं राहावें रामास अर्पण । हाच उपाय सांगती साधुजन ॥
२९ रामास अर्पण व्हावें कोण्या रीतीं । त्याचा मार्ग सज्जन सांगती ॥
३० प्रयत्नेवीण राहों नये । फलाची आशा ठेवूं नये ॥
३१ भगवंताला विसरूं नये । कर्तव्यदृष्टीनें कर्म करण्यास चुकूं नये ॥
३२ प्रथम राखावें भगवंताचें अधिष्ठान । तेथें प्रयत्नाला उगम ॥
३३ अखंड राखावें अनुसंधान । येणें कर्म होईल सहज रामार्पण ॥
३४ उपास्यदेवतेची करावी आठवण । मनानें जावें त्यास शरण ॥
३५ सद्गुरुसी झाला जो अनन्य । त्यास दुजें करणें नाहीं अन्य ॥
३६ भगवंताला होतां अर्पण । तेथें देहाचें सुखदुःखाचें नाहीं कारण ॥
३७ दुसऱ्याला दत्तक झाला । त्याचा भार बापानें घेतला ।
तैसें व्हावें आपण रामार्पण । त्याचें तो पाहून घेईल जाण ॥

३८ सद्वृत्ती सद्गुण दुर्गुणादि विकार । हे सर्व करावें रामार्पण ।
त्यानेंच रामाचें होऊन राहाणें जाण ॥

३९ राजापोटीं पुत्र जन्मा आला । राजपद हातींचालत आलें त्याला ।
तैसें आपण व्हावें रामार्पण । विषयाचा न लागे तेथें लाग जाण ॥

४० मनानें भगवंतास जावें शरण । व्यवहारांत दक्षता ठेवावी आपण ॥

४१ अन्याय झाले बहु फार । पश्चात्तापानें होती दूर ।
ऐसा आहे जरी सिद्धांत । तरी पण व्हावें लागे शरणागत ॥
४२ अनन्य व्हावें रामास शरण । तुझेविण नाहीं मागणें कांहीं अन्य ।
हा ठेवावा सदा मनीं ध्यास । दया येईल रामरायास ॥
४३ जेव्हां मनासकट देह केला अर्पण ।
मग मरणाच्या भयाचें काय कारण ॥

## आचरणीय वेदान्त

[ श्रीराम, आत्मा व परमात्मा हे तिन्ही एकरूपच आहेत. मी देह आहे हें अज्ञान तर मी आत्मा आहे हें ज्ञान होय. आत्मा अकर्ता, निर्गुण, निराकार, सर्वव्यापी व कल्पनेच्या पलीकडे आहे. सत्तामात्रें शरीरांत राहून जिवाचें नियमन तो करतो. माया ही त्याचीच शक्ति. जीवाला ती वासनारूपानें छळते. जीव भगवंताच्या आधीन झाला कीं, माया लटकी पडते. ]

१ श्रीराम जगज्जीवन । तोच परमात्मा जाण ॥
२ आत्मा तो वेगळेपणानें नसे । श्रीराम परमात्म्याव्यतिरिक्त नसे ।
३ त्या परमात्म्याचें ठिकाण । आत्मज्ञानास सांपडे खूण ॥
४ जीव करी आत्म्याचें शोधन ।
तात्काळ तुटे भवबंधन । प्राप्त होय ब्रह्मज्ञान ॥
५ मी कोणाचा कोण । मी आलों कोणीकडून ।
तूं आहेसी अजन्म आत्माचि निधान ॥
६ आत्म्यासी नाहीं जन्ममरण । हें सत्य आहे जाण ॥
७ आत्म्यास नसे जन्ममरण । तरी तो देहांत आला कैसा कोण ? ॥
८ आत्मा निर्गुण निराकारी । त्यासी नाहीं जन्ममृत्यूची भरी ।
तो सत्तामात्र वसे शरीरीं ॥
९ आत्मा नाहीं कर्ता हर्ता । तो कल्पनेच्या परता ॥
१० तूं आहेस आत्मा । सर्व व्यापूनि वेगळा तो परमात्मा ॥
११ सर्व पोथ्यांचें सार । सर्व साधुसंतांचा विचार ।
परमात्मा एकच सत्यजाण ॥
१२ रामापरतें सत्य नाहीं । श्रुतिस्मृति सांगतात हेंच पाहीं ॥

१३ रामसत्तेवीण न हाले पान । हें सर्व जाणती थोर लहान ॥
१४ श्रीरामरूप ब्रह्मस्वरूप निर्गुण सगुण सुंदर ।
तयासी माझे अनंत नमस्कार ॥
१५ रामाविणें सत्य कांहीं । सत्य सत्य जाण दुजें नाहीं ॥
१६ दुःखाचा हर्ता व सुखाचा कर्ता ।
परमात्म्यावांचूनि नाहीं कोणीं परता ॥
१७ रामापरतें हित । सत्य सत्य नाहीं त्रिभुवनांत ॥
१८ आपुले आधीं आला । आपुले संगत राहिला ।
आपुले मागें उरला । त्याची संगत धरतो भला ॥
१९ परमात्मा न्यायरूप आहे । म्हणजे परमात्मा सत्य आहे ॥
२० रामावीण सत्य सत्य कांहीं । सत्यत्वाला उरलें नाहीं ॥
२१ जसा सूर्याला अंधार नाहीं ।
तसें परमात्म्याशीं असत्य अन्याय नाहीं ॥
२२ स्वार्थरहित प्रेम । हीच परमात्म्याची खूण ॥
२३ रामाचा आधार जन्माआधीं आला ।
पण माझें मीपणानें सोडून गेला ॥
२४ सर्व स्थिति लय कर्ता । एकच प्रभू माझा राम त्राता ॥
२५ राम सर्वव्यापी भरला । तो माझेपासूनि दूर नाहीं जाहला ॥
२६ परमात्मा सर्व ठिकाणीं भरला ।
त्याचेवीण रिता नाहीं ठाव उरला ॥
२७ सर्व जीव पराधीन । सर्व परमात्म्याचे आधीन ॥
२८ म्हणून जें जें घडेल कांहीं । तें तें त्याचे सत्तेनेंच पाहीं ॥
२९ जगाची उत्पत्ति स्थिति लय । हें परमात्म्याचे हातीं ।
मनीं न वाटूं द्यावी खंती ॥
३० मायेच्या आधीन झाला । सत्य सत्य तोचि वायां गेला ॥
३१ माया ज्यास सत्य वाटते । तें ज्ञान फार खोटें ॥
३२ आपण मायेआधीन झाला । हा मुख्य जीवदशेचा घाला ॥
३३ चातुर्य बुद्धि देहभाव वासना कल्पना ।
ही मायाच अवघी जाणा ॥
३४ माया बहुत जुनाट । तिनें बहुतांस भोगविले कष्ट ॥
३५ मुख्य देहबुद्धि अविद्यात्मक । अविद्या पराक्रम साधी फार ॥

३६ तिची शक्ति फार मोठी । आत्मदर्शन न होऊं देई मेटी ॥
३७ तिनें लोकांसी घालूनी भ्रम । वृथा करावी साधनांचे श्रम ॥
३८ माया भ्रमाचीच मूळ भ्रांती । समाधान न धरिती ॥
३९ वासनारूपी स्फुरण । त्या मार्गानें मी आलों जाण ॥
४० वासना दृढ होऊन मी बद्धमार्गानें जातों ।
आणि जन्ममरणास पात्र होतों ॥
४१ म्हणून वृथा वासना अज्ञानपण । वासनारूपी जन्ममरण ॥
४२ भ्रम हीच जीव माया । सांडोनि ब्रह्मरस घेई राया ॥
४३ माया तूं सोडोनी भ्रांतिमळ ब्रह्मरूप होई केवळ ॥
४४ माझें कोणी नाहीं । मी कोणाचा नाहीं ।
जग आणि देह अगदीं माझें नाहीं ॥
४५ आतां करीं शूर मन । मायेसी हटवावें आपण ॥
४६ आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण ॥
४७ सुखदुःख विपत्ती आपत्ती । ही मायाप्रपंचाची ओहोटी-भरती ॥
४८ अभिमानांत परमात्म्याचें विसरण । हें जीवपणाचें मुख्य लक्षण ॥
४९ मान अपमान जगाचें सुखदुःख। हें स्वार्थाचेंच मूळ आहे जाण ॥
५० विषय मी एकजीव झालों जाण । सुटतां न सुटे आपण जाण ॥
५१ जग विषयाकार राहिलें । तेथें प्रेम केलें । तरी घातासी आलें ॥
५२ परमात्म्याची प्राप्ती । न होई राखतां विषयासक्ती ॥
५३ जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ॥
५४ रामावीण नाहीं दुजी आवड । हीच ज्ञानाची खरी जोड ॥
५५ मनुष्यदेहाचें सार्थक । मी रामरूप व्हावें सत्य ॥

# श्रीगोंदवलेकर महाराज

## यानीं सांगितलेल्या रूपक कथा

### चोरांचें सत्य

एक मनुष्य एका गांवाहून दुसऱ्या गांवास जात होता. वेळ रात्रींची होती, वाट जंगलांतून होती. इतक्यांत त्याला दोन माणसांचें बोलणें ऐकूं आलें. त्यानें जरा लक्ष देऊन तें ऐकलें. एक म्हणाला, "हें बघ! मला बुवा खोटें अगदी खपत नाहीं. माणसानें नेहमीं खरेपणानें वागावें." दुसरा म्हणाला, "तूं म्हणतोस तें योग्यच आहे, पण मला बुवा अन्यायाची भारी चीड आहे. आपण न्यायानें वांटणी करूं, मग त्यामध्यें ज्याच्या वांट्याला जें येईल तें त्यानें बिनतक्रार घ्यावें" असें दोघांचें बोलणें ऐकून वाटसरू म्हणाला, "काय गंमत आहे पहा! दोघेहि आहेत चोर आणि भाषा मात्र बोलतात सत्याची व न्याय अन्यायाची. आपण आपलें पुढें जावें." असा विचार करून तो निघून गेला.

### मी तुमचें ऐकेन

एकजण बाजारांत निघाला. त्याचा मोठा मुलगा कपडे घालून तयार झाला. सहासात वर्षांचा लहान मुलगा 'मी येतों' म्हणून मागें लागला. बापानें त्याच्याकडून कबूल करून घेतलें कीं, "मी चालत येईन, कडेवर घ्या म्हणणार नाहीं, रस्त्यांत बसणार नाहीं रडणार नाहीं व कांहीं मागणार नाहीं." तो मुलगा थोडा वेळ चालला, पण पाय थकल्यावर मध्येंच बसला. बापानें त्याला चालवण्याचा प्रयत्न केला. तो उठेना; म्हणून आपण थोडा पुढेंहि गेला. इतक्यांत एक गाडी भरधाव येतांना दिसली. बाप झट्दिशीं मागें आला व त्यानें मुलाला उचलून कडेवर घेतलें.

तात्पर्य—आपण संतांकडे जावें आणि चिकाटीनें राहावें. त्याना सांगावें, "आपल्याकडे मी भगवंताच्या प्राप्तीसाठींच आलों आहें. शक्य तितकी आपली आज्ञा मी पाळीन." आपण साधनांत राहण्याचा प्रयत्न करावा, पण आपण प्रयत्न करून साधत नाहीं असें आढळल्यावर भगवंताची प्रार्थना करावी कीं, "भगवंता! मी आतां थकलों. माझें मन सुन्न झालें आहे. मी आहें हा असा आहें. माझ्यावर कृपा कर आणि मला दर्शन दे." संत काय किंवा भगवंत काय थोडी वाट पाहतात आणि आपण जर त्यांना चिकटून राहिलों तर थोड्या वेळानें आपलें काम करतात.

## मला जांवई करून घ्या

एका गांवांमध्यें एक अगदीं गरीब मुलगा होता. वयाला १८।२० वर्षें झाल्यावर त्याच गांवामधल्या एका मोठ्या व्यापाऱ्याकडे तो नोकरीला राहिला. एक दिवस तो मालकाला म्हणाला, मी तुमचें दुकान अगदीं नीट संभाळीन." मालक म्हणाला, "पण हें सर्व दुकान मी माझ्या जांवयाला देणार आहे." यावर मुलगा म्हणाला, "मग मलाच जांवई करून घ्या म्हणजे झालें!"

तात्पर्य—भगवंताचें होण्याला आपण लायक नाहीं हें स्पष्टच आहे, पण त्याची सेवा करावी असें आपल्याला मनापासून वाटतें म्हणून भगवंताला आपण सांगावें कीं, "भगवंता! मी अयोग्य आहे खरा. पण तुझी प्राप्ति होण्यास लागणारी तयारी तूं माझ्याकडून करून घे." भगवंत फार दयाळू आहे. तो आपलें म्हणणें ऐकेल व आपल्या मनासारखें करील हें खास.

## बायको आणि शांति

एका मनुष्याची बायको मोठी कजाग होती. ती त्याला छळीत असे. ती त्याला वाटेल तसें बोले, वाटेल त्या शिव्या देई आणि घरांत कटकट करी. तो मनुष्य आपल्या मित्राला म्हणाला, "बघ, माझी बायको झोपीं गेली कीं कशी शांत असते!" हें ऐकून मित्र हंसला.

तात्पर्य—रोज भगवद्गीता वाचतांना निरूपण ऐकतांना किंवा कादंबरी वाचतांना आपलें मन कसें शांत असतें! म्हणजे तें खरें शांत आहे असें का म्हणायचें? कसाहि प्रसंग आला तरी नेहमीं तें शांत राहणें हें खऱ्या शांतपणाचें लक्षण होय.

## हा पाहुणा कोणाचा ?

एकदां एका गृहस्थाकडे एक पाहुणा आला. नवऱ्याला वाटलें कीं, तो आपल्या बायकोचा मामा आहे. बायकोला वाटलें कीं, तो नवऱ्याचा कोणीतरी आहे. दोन दिवस पाहुणा मजेंत राहिला. नंतर नवऱ्यानें बायकोला विचारलें, "हा तुझा कोण? " ती म्हणली, "छे ! तो माझा कोणीच नाहीं." नवरा म्हणाला "तो माझाहि कोणीच नाहीं " हें जेव्हा पाव्हण्याच्या लक्षांत आलें तेव्हां त्यानें मुकाट्यानें काढता पाय घेतला.

तात्पर्य—अहंकाराला वाटलें कीं, विषय बुद्धीचा धर्म आहे. बुद्धीला वाटलें कीं, तो अहंकाराचा धर्म आहे; पण आपण भगवंताचे आहोंत हें जेव्हां दोघांना कळलें तेव्हां विषय आपोआप बाहेर पडला. भगवंताचें विस्मरण म्हणजेच विषयाला आमंत्रण होय. त्याचें स्मरण हें विषयाचें मरण होय.

## अहो, तुम्ही काय शोधतां?

एकदां एक मनुष्य लावलेला कंदील हातामध्यें घेऊन कांहींतरी शोधीत फिरूं लागला. लोकांनीं विचारलें, "अहो, तुम्ही काय शोधतां ? " तो म्हणाला, "माझा कंदील हरवला आहे, तो शोधत आहें." लोक म्हणाले, "अहो ! कंदील तर तुमच्या हातांतच आहे ना ! " तेव्हां तो गृहस्थ उमगला.

तात्पर्य—आपली अवस्था अशीच आहे. परमात्मा तर अगदीं आपल्या हृदयामध्यें आहे. त्याच्या प्रकाशानेंच, त्याच्या सत्तेनेंच आपले सर्व व्यवहार चालले आहेत, असें असून आपण त्याला इतर सगळीकडे शोधीत फिरतों, पण आपल्या हृदयांत मात्र पाहत नाहीं. तो आपल्याजवळ आहे.

## विहिणीचा मानापमान

चार लहान मुली भातुकली खेळत होत्या. त्यांच्यापैकी एका मुलाची आई झाली व दुसरी मुलीची आई झाली. मुलीच्या आईनें विहिणीला मेजवानी केली. विहीण जेवायला बसली होती. तिनें बासुंदी मागितली. मुलीच्या आईनें एक बोळके आणून तें तिच्या पानांत ओतलें. त्याबरोबर विहीण रागावून ओरडली, " हें हो काय ? मीं मागितली बासुंदी आणि तुम्हीं आपली आमटी

आणून वाढली. हें शोभतें का ?" मुलीची आई परत गेली आणि दुसरें बोळकें घेऊन आली. दोन्हीं बोळकीं रिकामीच होती. विहीण मात्र खूष झाली.

तात्पर्य—उपासनेच्या दृष्टीनें व्यवहाराला भातुकलीइतकेच महत्त्व आहे. व्यवहारांत मोठा मान मिळाला काय, किंवा अपमान झाला काय, भगवंताच्या दृष्टीनें त्याची फारशी किंमत नाहीं. हें लक्षांत ठेवून जो वागेल त्याच्या मनावर सुखदुःखाचा फारसा परिणाम होणार नाहीं.

## बायकोचा पगार

एक मोठा श्रीमंत मनुष्य होता. त्याच्या घरी पुष्कळ नोकरचाकर, गडीमाणसें, नातेवाईक, बायकामुलें वगैरे माणसें होतीं. एकदां त्याचा मित्र त्याला भेटायला आला. त्यानें मालकाला विचारलें, "मित्रा ! या गडीमाणसांना तूं पगार काय देतोस ?" त्यानें सांगितलें, "घरच्या गड्याला जेवून खाऊन महिना सहा रुपये देतों, स्वैंपाक्याला महिना पांच रुपये देतों, मोलकरणीला पांच रुपये देतों. मित्रानें विचारलें, "तुझ्या बायकोला पगार काय देतोस ?" त्यानें सांगितलें, "अरे हें काय विचारतोस ? ती सर्वस्वी माझीच आहे म्हणून सगळें तिचेच आहे."

तात्पर्य—जो भगवंताला अनन्यशरण गेला त्याला सगळे नियम माफ असतात. बायको नवऱ्याशीं अनन्य झाली, कीं जें जें त्याचें आहे तें तें तिचेंच होतें. त्याचप्रमाणें आपण भगवंताशीं अनन्य झालों, कीं त्याचें सगळें आपलेंच बनतें.

## खतानें रोप मरून गेलें

कोंकणामध्यें एका माणसाचें लग्न झालें. आपल्या परसामध्यें त्यानें आंब्याचें एक छान रोप लावलें. आंबा उत्तम पोसावा म्हणून त्यानें त्या रोपट्याला केशराचें पाणी व खडीसाखरेचें खत घातलें. तरीपण कांहीं दिवसांनीं तें रोपटें जळून मरून गेलें. त्याला त्याचें कारण कळेना; म्हणून त्यानें आपल्या बायकोला विचारलें. ती म्हणाली, "मी अगदीं मनापासून त्या रोपट्याची काळजी घेतली. तुम्ही जेवून ऑफिसला गेल्यावर रोज चुलीमधील गरम गरम राख मी त्या रोपट्याला घालीं आणि नंतर माझें जेवण झालें कीं, त्याला पाणी घालण्यासाठीं तेथेंच हात धूत असे." नवऱ्यानें कपाळावर हात मारला आणि तो गप्प बसला.

तात्पर्य—आपली अवस्था अशीच आहे. आपल्या गुरूनें आपल्या अंतःकरणामध्यें भगवंताच्या प्रेमाचें रोपटें लावलें आणि तो त्याला काळजीपूर्वक जपत आहे; परंतु आपण मात्र विषयासक्तीची गरम राख रोज त्याला घालतों. त्या राखेच्या धगीनें तें रोपटें भाजल्यानंतर मग भगवंताच्या नामाचें थोडें पाणी आपण त्यावर शिंपडतों. असें केल्यावर तें रोपटें कसें जगेल ? तो नाजुक कोंब जळून मरून जातो. चुलींतील राख त्या बाईला परसामध्यें जर टाकायची होती तर थोडी पलीकडे टाकणें जरूर होतें. तरीसुद्धां पाऊस पडल्यावर त्या राखेची धग जमिनीमधून येऊन थोडीतरी आंब्याला बाधली असती. राख अगदीं दूर टाकणें हेंच योग्य आहे. तसें विषय भोगल्यावांचून आपल्याला राहवत नाहीं असें जर असेल, तर तो भगवंताजवळ तरी मागूं नका. थोडा जरी विषय भोगला तरी त्याची धग भगवंताच्या प्रेमाला लागल्यावाचून राहणार नाहीं हें ध्यानांत ठेवा.

## ओझें खालीं ठेवा

एकदां एक म्हातारा मनुष्य डोक्यावर ओझें घेऊन चालला होता. चालतां चालतां तो अगदीं थकून गेला. इतक्यांत मागून एक रिकामी बैलगाडी आली. गाडीवानानें विचारलें, "दादा ! तुला कोठें जायचें आहे ?" म्हाताऱ्यानें आपल्या गांवाचें नांव सांगितलें. गाडीवानाला पुढच्या गांवीं जायचें होतें. त्यानें म्हाताऱ्याला गाडीमध्यें बसण्यास सांगितलें. म्हातारा गाडीमध्यें बसला खरा, पण आपल्या डोक्यावरचें ओझें कांहीं खालीं ठेवीना. त्याला काळजी वाटे कीं, "आपण ओझें खालीं ठेवलें आणि बोचक्यांतलें कांहीं गेलें तर ?"

तात्पर्य—आपण एकीकडे देवाचें भजन-पूजन व नामस्मरण करतों आणि दुसरीकडे प्रपंचाचा भार डोक्यावर घेऊन काळजी करतों. हें बरोबर आहे का ? आपल्याला प्रपंचाचा लोभ व प्रपंचाची आसक्ति असते म्हणून काळजी सुटत नाहीं.

## मिश्रण प्रमाणांत पाहिजे

एका मुलीचें लग्न होऊन ती नवीनच सासरी आली. सासूनें तिला पिठलें करायला सांगितलें. माहेरीं अर्थात् तिला स्वैंपाक करण्याची संवय नव्हती. पिठलें करायला बसल्यावर पहिल्यानें पाणी जास्त झालें म्हणून तिनें पीठ जास्त घातलें. पुढें पीठ जास्त झालें म्हणून तिनें पाणी जास्त

घातलें. असें करतां करतां कांहींतरी तयार झालें. तेंच जर तिनें आपल्या आईचें करणें नीट पाहून ठेवलें असतें तर त्या वेळीं उपयोगी पडलें असतें.

तात्पर्य—चित्रामध्यें अनेक प्रकारचे रंग असतात. निरनिराळे रंग बरोबर प्रमाणांत मिसळले तरच आपल्याला पाहिजे तो रंग तयार होतो, त्याचप्रमाणें जीवनामध्यें प्रपंच व परमार्थ यांचें योग्य मिश्रण केलें पाहिजे, आपण संतांची वागणूक पहावी आणि तें मिश्रण करायला शिकावें,

## प्रत्येकाची दृष्टि निराळी

एका ठिकाणीं चार माणसें पत्ते खेळत बसलीं होतीं. इतक्यांत त्यांच्या ओळखीचा एक शेटजी परगांवीं वारल्याची तार आली. त्यांच्यापैकीं एकजण शेटजीचा जवळचा नातेवाईक होता. तो दुःखानें विव्हळून रडूं लागला. दुसऱ्याचे कांहीं पैसे शेटजीकडून येणें होते, त्याला काळजी वाटूं लागली. तिसऱ्यानें शेटजीकडून पैसे हातउसने घेतले होते, त्याला आनंद वाटला. चवथ्याचा शेटजींशीं विशेष संबंध नव्हता. त्याला वाटलें हा सृष्टिक्रमच आहे, त्याबद्दल सुखदुःख कशाला करावें.

तात्पर्य—जगामध्यें एकच वस्तु कोणाला सुखदायक तर कोणाला दुःखदायक ठरते. म्हणजे मूळ वस्तु सुखरूपही नाहीं व दुःखरूपही नाही, ज्या रीतीनें आपली वासना तिच्यामध्यें गुंतलेली असेल त्याप्रमाणें ती आपल्याला सुख किंवा दुःख देते. ज्याची वासनाच कोठें गुंतलेली नाहीं त्याला जगामध्यें सुखदुःख नाहीं, ही दृष्टि एकच आहे. ती म्हणजे भगवंताची दृष्टि होय.

## कां, केव्हां, कोठें, कसें !

एका विश्वविद्यालयामध्यें एक अति हुशार व विद्वान् विद्यार्थी होता. तो समाजशास्त्राचा अभ्यास करीत असे. त्याला मुली सांगून येऊं लागल्या, तेव्हां विवाह करण्याच्या आधीं विवाहसंस्था कां, केव्हां, कोठें व कशी उत्पन्न झाली याचा निकाल लावावा असा त्यानें विचार केला. त्यानें एक प्रश्नावली तयार केली आणि विवाहित लोकांना ती दाखविण्यास तो निघाला. पहिल्या-प्रथमच ज्या कुटुंबाकडे तो गेला तेथें नवराबायको आणि आठ मुलें येवढा परिवार होता. नवराबायकोंनीं ती प्रश्नावली पाहिली आणि दोघेंहि हंसूं लागले.

बाईनें सांगितलें, " या प्रश्नांपैकीं एकहि प्रश्नाचें उत्तर माहीत नसतां विवाह होतो व मुलेंबाळें होतात; सगळा प्रपंच चालतो. हा उपद्व्याप न करतां तुम्ही आपलें सरळ लग्न करा. पण विद्वानाला हें पटलें नाहीं.

तात्पर्य—परमार्थ हें कृतीचें शास्त्र आहे. तेथें स्वतःला अनुभव आल्या-वांचून उपयोग नाहीं, पण भगवंताचा अनुभव येण्यासाठीं " ही सृष्टि कां उत्पन्न झाली, ती केव्हां उत्पन्न झाली, कोठें उत्पन्न झाली; कशी उत्पन्न झाली, तिच्या-मध्यें तत्त्वें किती आहेत, वगैरे प्रश्नांचीं उत्तरें आधीं मिळालीं पाहिजेत असें मुळींच नाहीं. किंबहुना, ज्याला भगवंताच्या अनुसंधानाचें महत्त्व कळलें तो या भानगडींत वेळ घालविणार नाहीं. साधकानें कोरड्या वेदान्त चर्चेच्या नादी लागूं नये. पण विद्वानाला त्याशिवाय चैन पडायचें नाहीं हेंहि खरें.

## अहो, जगांत सुख नाहीं

एका साधूनें चार म्हातारे गोळा केले आणि प्रत्येकाला जगाचा अनुभव विचारला. पहिला म्हातारा म्हणाला, "छे हो! जग भारी लबाड आहे. कोणाला मदत करायची सोय नाहीं" दुसरा म्हणाला, "काय बोलायचें आणि काय सांगायचें! सध्या जगामध्यें किती अनीति वाढली आहे पहा. कोणावर विश्वास टाकायची सोय उरली नाहीं." तिसरा म्हणाला, "आमच्या लहानपणीं हें असे नव्हतें, आतां जग फार स्वार्थी झालें आहे." चवथा म्हणाला, "माझें तर स्पष्ट असें मत आहे कीं, या जगांत सुख व समाधान नाहींच मुळीं." सर्वांचें म्हणणें ऐकून साधु म्हणाला, "चला आपण सगळेच जण संन्यास घेऊं. कोठें या जगा-च्या नादीं लागा! पुढें साधु काय बोलतो हें ऐकण्यास एकही म्हातारा तेथें थांबला नाहीं.

तात्पर्य—जगापासून सुखाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे, असें प्रत्येक मनुष्य म्हणतो. परंतु मोठें आश्चर्य असें कीं, आजपर्यंत न मिळालेलें सुख उद्यां मिळेल या आशेनें तो त्यांतच पुनः गुरफटतो. उद्यां सुख मिळेल या आशेवर मनुष्य प्रपंचांत गुंतून राहातो; म्हणून त्यांत रमतो; पण उद्यां मिळणाऱ्या सुखाची आशा खात्रीची नसल्यामुळें मनुष्याला काळजी उत्पन्न होते. मागच्या दुःखाची जाणीव आणि उद्यांच्या सुखाची काळजी या हेलकाव्यामध्यें आपलें सर्व जीवन संपून जातें.

# स्वामी विवेकानंदांचें अमेरिकेंतील प्रभावी कार्य

स्वामी विवेकानंद यानीं अमेरिकेंत जाऊन आमच्या वेदान्ताचा व धर्माचा जो प्रभावशाली प्रचार केला त्याला तोड सापडणार नाहीं. इतकीं वर्षे होऊन गेलीं. त्याचा प्रभाव आजही वाढत्याप्रमाणांत दिसून येत आहे. १८९३ सालीं शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेंतील आपल्या भाषणानें त्यांनीं साऱ्या श्रोत्यांची मनें भारून टांकली.

—संपादक.

सोमवार ता. ११ सप्टेंबर १८९३ रोजीं अमेरिकेतील मिशगन सरोवराच्या काठीं वसलेल्या शिकागो शहरांत जागतिक सर्वधर्मपरिषद सुरू झाली. ही परिषद कोलंबस स्मारक मंदिरातील आर्ट पॅलेस या नांवाच्या प्रचंड मंडपात भरविली गेली होती. सुमारे सहा—सात हजार स्त्री—पुरुष बसूं शकतील अशी व्यवस्था करण्यांत आली होती. मंडपात सर्व बाजूंनी हंड्या आणि झुंबरे लटकत होती. देशोदेशींचीं निशाणें फडकत होती. सुमारें दोनशें लोकांना बसतां येईल असें व्यास पीठ उभारण्यांत आलें होतें. निरनिराळ्या धर्मातील थोर थोर लोकांचे पुतळे तिथें उभे होते. व्यासपीठाच्या वरच्या बाजूस कोलंबस अमेरिकेच्या भूमीवर पहिलें पाऊल टाकीत आहे असें भव्य तैलचित्र टांगण्यांत आले होते.

या सर्वधर्मपरिषदेचें उद्घाटन डॉ. बरोज यांनी त्यादिवशीं सकाळीं १० वाजतां केलें. या परिषदेचे अध्यक्ष युरोपांतील कॅथॉलिक पंथाचे धर्ममार्तंड कार्डिनल गिबन्स हे होते. त्यांच्या डाव्या नि उजव्या हाताला हिंदु, बौद्ध, जैन, यहुदी, कन्फ्यूशियन, शिन्तो आणि इस्लाम ह्या धर्मांचे प्रतिनिधि बसले होते. ह्या प्रतिनिधींना मुद्दाम आमंत्रण दिले गेले होते. पण आमंत्रण नसतांनाहि एक व्यक्ति त्या परिषदेस हजर होती व ती

व्यक्ति म्हणजे स्वामी विवेकानंद. ते कोठल्याच एका धर्माचे अनुयायी नव्हते. साऱ्या धर्माच्या एकतेवर त्यांचा विश्वास होता. त्यांचा धर्म अतिशय व्यापक होता. त्यांचा हिंदुधर्म ज्याला अनेक नद्या येऊन मिळतात तो महासागरासारखा होता. त्यांच्या हिंदुधर्मात साऱ्या धर्मांचे मीलन झालेलें होतें. या परिषदेस हिंदुधर्माचे एक पुरस्कर्ते उपस्थित आहेत अशी कुण कुण अध्यक्षांना लागली होती.

या सर्वधर्मपरिषदेंत स्वामीजींना बोलण्याची विनंती करण्यांत आली व ती अध्यक्षांनी केली. मग स्वामीजी आपल्या आसनावरून उठले. व्यासपीठाजवळ गेले. त्यांचा केशरी पोषाख आणि भगवा फेटा याकडे सर्वांचे लक्ष वेधलें होतें. उंच देहयष्टि, मजबूत बांधा, कमलासारखे डोळे, ब्रह्मचर्याचे तेज यामुळें सारे श्रोते स्तब्धपणें त्यांचेकडे, त्यांच्या हालचालीकडे पाहात होते. स्वामींच्या समोर जगांतील सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधि बसले होते. कवि, शास्त्रज्ञ, कलावंत, तत्त्वज्ञानी, सेनानी, मुत्सद्दी, राजकारणी, धर्मज्ञ असे त्या त्या शाखांतील प्रमुख विवेकानंदांकडे आतां एकाग्रतेनें पंहात होते. टांचणी टाकली तरी तिचा आवाज ऐकूं जाईल इतकी शांतता सभागृहांत होती.

शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेंत बोलावयास उभे राहिल्यानंतर त्यांच्या तोंडून जे शब्द प्रथम बाहेर पडले, त्या शब्दांतून त्यांचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान स्पष्टपणे दिसून येत होता. यांच्या सुरुवातीच्या तीनच शब्दांनी अमेरिकनांवर अद्भुत मोहिनी घातली. धीर गंभीर वाणीनें त्यानी आपल्या श्रोत्यांना संबोधलें, "माझ्या अमेरिकन बंधुभगिनीनो!" त्यांच्या तेजस्वी मुखांतून बाहेर पडलेले हे तीनच शब्द ऐकून सभागृहांत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला व तो दोन मिनिटें चालला होता. ह्या दृश्याचें वर्णन करताना एका पाश्चात्य लेखकाने लिहिले आहे "विवेकानंदांचे शब्द कानांवर पडतांच लोक जणूं एकदम वेडे झाले. टाळ्यांचा गजर संपल्यावर विवेकानंदांनी जगांतील सर्वांत प्राचीन देशाच्या वतीने सर्वांत अर्वाचीन देशाला शुभेच्छा व्यक्त केल्या आणि भारतांतील प्राचीन ऋषिमुनींच्या वतीनें अमेरिकनांना शुभाशीर्वाद दिले, नंतर त्यांनी हिंदुधर्माचा परिचय करून दिला. हिंदुधर्म ही सर्व धर्मांची गंगोत्री आहे.

सर्व धर्म हिंदुधर्मातूनच उगम पावलेले आहेत. हिंदुधर्माने साऱ्या विश्वातील मानवांना सहिष्णुतेचा व सर्वोदयाचा संदेश दिलेला आहे. साऱ्या नद्या ज्याप्रमाणे महासागराला जाऊन मिळतात त्याप्रमाणे सारे प्राणी परमात्म्यांत विलीन होतात. कोणी कोणत्याही मार्गाने जावे, अखेरीस तो परमेश्वराच्या चरणांशींच जाऊन पोहोंचतो" असें हिंदुधर्माचें मत असल्याचें त्यांनी सांगितलें. आपल्या भाषणांतून त्यांनी "मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव" हा श्रीकृष्णाचा संदेश तिथें सांगितला. "मनुष्य पापातून पुण्याकडे प्रवास करीत नाहीं; दुःखांतून सुखाकडे जात नाही अथवा असत्यांतून सत्यांत प्रवेश करीत नाही तर कमी पुण्यांतून अधिक पुण्यांत; कमी सुखांतून अधिक सुखांत व अंधुक सत्यातून पूर्ण प्रकाशमान सत्यात प्रवेश करतो. चैतन्याचा अनुभव घेऊन तो स्वतः पूर्ण चैतन्यस्वरूप होतो" हा अभिनव संदेश स्वामींनीं त्यावेळीं सर्व जगाला दिला.

या आपल्या पहिल्या भाषणानेच स्वामी विवेकानंदांनी सारी सभा जिंकून टाकली. त्यानंतर त्या परिषदेचे स्वामीजी प्राणच बनले. एखाद्या भाषणाच्या वेळीं श्रोते कंटाळून उठून जाऊं लागले कीं स्वामीजी नंतर बोलणार आहेत, अशी अध्यक्ष घोषणा करीत आणि ह्याच हेतूने त्यांचे भाषण सर्वांत शेवटी ठेवीत असत.

स्वामीजींनी परदेशांत इतर प्रतिनिधींप्रमाणे निरनिराळ्या धर्मांची कधींच तुलना केली नाहीं. दुसऱ्याच्या धर्माची कुचेष्टा केली नाहीं, टवाळी केली नाही. सर्व धर्म सत्य आहेत आणि सर्व धर्म एकच आहेत हेंच मत त्यांनी प्रतिपादन केलें. हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व पटवून देतांना ते म्हणाले, "ख्रिस्ती धर्माप्रमाणेच हिंदु धर्म तुम्हांला पापात्मे समजत नाही. तुम्ही पापी नाहीं. तुम्ही परमेश्वराची लेकरें आहांत. तुम्ही अमृतपुत्र आहांत. तुम्हांला पापी म्हणणे हेंच सर्वांत मोठें पाप आहे."

भारतांत येणाऱ्या ख्रिस्ती पाद्र्यांच्या मोठ्या संख्येचा उल्लेख करून ते म्हणाले, "माझ्या देशाला धर्माची आवश्यकता नाही. त्याला भाकरीची जरूरी आहे. पश्चिमेकडून एखादा संदेश नेण्याकरितां मी आलेलो नाही, परंतु माझ्या गरीब देशाला तुमची सहानभूति मिळविण्याकरितां मी आलो आहे."

अमेरिकेतल्या ह्या सर्वधर्मपरिषदेत स्वामीजींनी अमेरिकेवर विलक्षण छाप पाडली. त्यांच्या ह्या कार्याविषयीं अमेरिकेंतील न्यूयार्क हेरल्ड या वृत्तपत्राने लिहिलें, " स्वामीजी सर्वधर्मपरिषदेतील सर्वांत महान् व्यक्ति होती. त्यांची भाषणें ऐकल्यानंतर त्यांच्या देशांत ख्रिस्ती पादऱ्यांना धर्म-प्रचारार्थ पाठविणे हा निव्वळ वेडेपणा आहे असा विचार मनांत येई." ह्या परिषदेच्या आठपणी श्रीमती ॲनी बेझंट ह्यांनी लिहिल्या आहेत. त्यांत त्या म्हणतात, " विवेकानंदांना पाहून लोक आपसांत कुजबुजत, हा माणूस ख्रिस्ती नाही म्हणून काय त्याला नास्तिक म्हणायचें ? आपण ह्यांच्या देशांत ख्रिस्ती पाद्री पाठवितो, त्यापेक्षां त्यांनी आमच्या देशांत आपल्या देशांतले धर्म-प्रसारक पाठविले तर किती चांगले होईल !"

अमेरिकेचा दौरा करतांना नंतर एका भाषणांत स्वामीजी म्हणाले :—" तुम्ही तुमच्या पादऱ्यांना शिकवतां, कपडेलत्ते देतां आणि वर पगारहि देतां, तो एव्ह्याचकरितां कां कीं त्यांनी माझ्या देशांत जावें आणि माझ्या पूर्वजांना, माझ्या धर्माला आणि माझ्याशी संबंधित प्रत्येक गोष्टीला शिव्या द्याव्यात ? तुमचे पाद्री एखाद्या देवालयासमोर जाऊन उभे रहातात आणि लोकांना उद्देशून म्हणतात, मूर्तिपूजकांनो, तुम्ही नरकांत जाल !" ते आमच्या धर्मावर, आम्हांला पवित्र आदरणीय असणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर निंदेची एवढी चिखलफेंक करतात कीं लक्षांत ठेवा, आम्हीं हिंदी महासागराच्या तळाशीं असलेला सारा चिखल गोळा करून तो पाश्चात्य देशावर फेंकला तरी तो ह्या चिखलफेंकीच्या पासंगालाहि पुरणार नाही ! आणि हें सारे कशाकरितां ? आम्ही कधीं एखादा तरी धर्मप्रचारक तुमच्या देशांत पाठविला आहे ? तसें पाहिले तर तुमचा कॅथोलिक धर्म बौद्ध धर्मातूनच निर्माण झालेला आहे. तुमच्या धर्माचा प्रसार तुम्हांला कधीं तलवारीच्या मदतीवाचून करतां आला आहे ? ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराच्या साऱ्या इतिहासांत, तलवारीचा पाठिंबा न घेतां धर्मप्रसार करण्यांत तुम्हांला यश आलें आहे, असें एक तरी उदहारण तुम्हीं दाखवूं शकाल ? तुमच्या पूर्वजांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यात आली पण त्यापूर्वी कत्तली करण्यांत आल्या होत्या. तलवारीवर जगणाऱ्या रोमन आणि अरब लोकांप्रमाणेच तुमचाहि नाश झाल्याशिवाय राह-णार नाहीं."

ह्याप्रमाणे पददलित राष्ट्रातील एका व्यक्तीनें परदेशी जाऊन संस्कृतीच्या आणि वैभवाच्या शिखरावर असलेल्या पाश्चात्य राष्ट्रांना ठणकावून जाब विचारला. त्यांच्यापेक्षां आपला धर्म, आपली संस्कृति अधिक प्रगत आणि नैतिक दृष्ट्या अधिक उंच आहे अशी त्यांच्याजवळून कबूली घेतली. आशियावर संपूर्ण सांस्कृतिक विजय मिळविण्याचें पाश्चात्य साम्राज्यवादी राष्ट्राचे जे मनोरथ होते ते धुळीला मिळवून टाकले. स्वामी विवेकानंदाच्या ह्या कार्याचे धार्मिक महत्त्व तर होतेंच परंतु त्याला राजकीय महत्त्वच अधिक होतें. त्याच्या ह्या कार्याने भारतीयांचा स्वाभिमान जागृत झाला. त्यावेळची आमच्या या भारतातील परिस्थिति काय होती ह्याचें चित्र डोळ्यासमोर आणले तर विवेकानंदाच्या ह्या कामगिरीचें महत्त्व पटेल. ब्रिटिशाचे राज्य भारतावर सुस्थिर झाल्यानंतर येथील लोकाचा पद्धतशीरपणे तेजोभंग करण्याचें कार्य त्यानी सुरू केलें होतें. ते येताना हातात तागडी घेऊन आले होते, परंतु आतां त्यानी तागडी फेंकून देऊन एका हातात तलवार व दुसऱ्या हातात बायबल घेतलेलें होतें. येथील लोकाना तीस वर्षांत ख्रिस्ती करून टाकूं अशी त्याना उमेद होती. भारतीयाचा स्वाभिमान व स्वधर्मप्रेम नष्ट होईल अशा रीतीचा शिक्षणक्रम मेकॉले साहेबानी भारतीयाकरिता आखला होता. भारतीय भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान, संस्कृति, ह्याविषयीं लोकाच्या मनात तुच्छता निर्माण व्हावी म्हणून पद्धतशीरपणाने शिक्षण देण्यास सुरुवात झाली होती. इंग्रजी कार्यकर्ते व पदाधिकारी ह्यांना खात्री होती कीं आशियातल्या इतर देशाप्रमाणेच भारतहि थोड्याच वर्षात ख्रिस्तमय करून टाकूं. त्याच्या शिक्षणाचा आणि हिंदुधर्मविरुद्धच्या प्रचाराचा 'सुशिक्षित' समजल्या जाणाऱ्या लोकावर हळू हळू परिणामहि होऊं लागला होता. साहेबाचें तेवढें चागलें व आपलें तेवढें वाईट असें इंग्रजी शिक्षण घेतलेल्याना वाटूं लागलें होतें व त्यातील काहीनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकारहि केला होता. साऱ्या देशात पाद्र्याचे जाळें पसरलेलें होतें आणि त्याना राज्यकर्ते शक्य तें सर्व सहाय्य देत होते. भारतीयाना भारतीयत्वाची लाज वाटूं लागली होती. आपण कनिष्ठ दर्जाचे लोक आहोंत अशी त्याची दृढ समजूत झाली होती. भयंकर न्यूनगंडानें त्याना पछाडून सोडलें होतें. अशा परिस्थितींत स्वामी विवेकानंद अमेरिकेला गेले आणि त्यानी तिथें सर्वधर्मपरिषदेंत भारतीय धर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें. ही गोष्ट लक्षात

घेतली म्हणजे त्याच्या कार्याचें मोल कितीतरी पटीने अधिक वाटतें. भारतीयाच्यामध्यें स्वदेशाभिमानाची ज्योत त्यानीच प्रज्वलित केली. नंतर सुमारें पन्नास वर्षांनी भारताला जें स्वातंत्र्य प्राप्त झालें त्याचा पाया त्याच्या ह्या अमेरिकेच्या दौऱ्यानेच घातला असें म्हटलें तर मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. आपल्या पहिल्याच भेटींत भारतीयांना स्वाभिमान वाटावा, त्याचे मस्तक उन्नत व्हावें, जगात त्याना प्रतिष्ठेचें स्थान लाभावें अशी अतुलनीय कामगिरी स्वामीजींनी करून दाखविली. स्वामीजींचा तेजःपुंज देह पाहून आणि त्याचे भाषण ऐकून अमेरिकेतील ख्रिस्त्याचे डोळे दिपून गेले. तत्त्वज्ञानाच्या गहनतेंत, अध्यात्माच्या गांभीर्यांत, विचाराच्या स्वतंत्र अभिव्यक्तींत, मानवतेच्या अनुभूतींच्या व्यापकतेंत आणि नैतिकतेच्या परिपूर्णतेंत व सौंदर्यांत ख्रिस्ती धर्मापेक्षाहि वरचढ असा एक धर्म या पृथ्वीतलावर अस्तित्वात आहे ह्याची अमेरिकनाना प्रथमच जाणीव झाली.

शिकागोमधली सर्वधर्मपरिषद संपल्यानंतर एका श्रीमंत अमेरिकनाच्या घरीं स्वामीजींची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तेथील वैभव पाहून त्याना आपल्या देशाच्या दारिद्र्याची तीव्रतेनें जाणीव झाली. एके दिवशीं मध्यरात्रीं ह्या विचारानी बेचैन होऊन ते खिडकीपाशीं जाऊन उभे राहिले. त्यानी आपल्या डोळ्यातून अश्रूंना वाट करून दिली. मग त्या पलंगावर आणि गाद्या गिरद्यावर झोपणे त्याना पाप वाटूं लागले. त्यानी नंतरची सारी रात्र जमिनीवर झोपूनच काढली.

स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेवर विलक्षण प्रभाव पाडलेला पाहून तेथील पाद्र्याना त्याचें वैषम्य वाटूं लागले. त्यांच्या चारित्र्यावर ते प्रखर टीका करूं लागले. नंतर त्यांची मजल येथपर्यंत गेली कीं स्वामीजींना मोह पाडण्याकरिता ते मुद्दामच सुंदर-सुंदर युवती त्याच्याकडे पाठवूं लागले. एकदा ह्या उद्देशाने त्याच्याकडे पाठविण्यात आलेली एक लावण्यवती फ्रेंच युवती मोठ्या प्रेमात येऊन त्याना म्हणाली, "मला तुमच्यासारखा एक मुलगा झाला तर किती बरं होईल!"

त्यावर स्वामीजींनी गंभीर स्वरांत उत्तर दिलें, "माते, खंत कशाला करतेस? तो तुझा मुलगाच तर तुझ्या समोर उभा आहे!"

स्वामी विवेकानंदांनीं सर्वधर्मपरिषदेत केलेलें भाषण जगाच्या इतिहासांत नोंदलें गेलें आहे. त्यांचा त्या छोट्याशा भाषणातील विश्वात्मकता, मूलस्पर्शी आस्था व उदारता हीं अननुभूत होतीं. निरनिराळ्या धर्मांचीं तत्त्वें विश्वव्यापक आहेत आणि सर्वधर्मांचें ध्येय एकच आहे हें स्वामींनी उद्घोषित केवळ अश्रुत, अलौकिक व अभूतपूर्व होतें. आपला 'हिंदुत्व' हा प्रसिद्ध प्रबंध त्यांनी तिथें वाचला व वेदांताचे सार या सारख्या विषयावर ते चारदां बोलले. बौद्धधर्मावरहि त्यांनीं व्याख्यानें दिलीं. आपल्या अमेरिकेच्या वास्तव्यात त्यांनीं 'राजयोग' हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या व्याख्यानांनी अमेरिकन जनतेस अक्षरशः वेड लावून सोडले. अमेरिकेनंतर इंग्लंडचा त्यांनी दौरा केला. १८९७ च्या आरंभास ते "प्रिन्स रिजंट लिओपोल्ड" या जर्मन बोटीने भारतांत परतले. लंडनमध्यें त्यांनी धर्माची आवश्यकता, जगद्धर्माचे स्वरूप, व्यक्त आणि अव्यक्त पुरुष, माया आणि भ्रम, माया आणि साक्षात्कार, माया व मुक्ति इत्यादि विषयांवर २४ व्याख्यानें दिलीं. तींच 'ज्ञानयोग' या इंग्रजी ग्रंथांत समाविष्ट आहेत.

# बेलूरमठ व रामकृष्णमिशन

भारतांत आल्यावर स्वामी विवेकानंदांनी आपले एक स्नेही बलराम बोस यांचे घरीं स्वामींचे गुरुबंधू आणि इतर भक्त यांची एक सभा ता. १ मे १८९७ रोजीं भरविली. त्या सभेत सर्वांच्या संमतीनें एका संस्थेची स्थापना केली त्या संस्थेचे नांव आहे "रामकृष्णमिशन" श्रीरामकृष्णांनीं मनुष्य जातीच्या भल्यासाठीं जीं तत्त्वें शिकविलीं आणि स्वतःचे आयुष्यांत प्रत्यक्षपणें आचरून दाखविलीं त्या तत्त्वांचा प्रसार करणें, इतरांना त्यांच्या आधिभौतिक आणि आध्यात्मिक प्रगतीसाठीं हीं तत्त्वें आचरणांत आणण्यास मदत करणें हा या मिशन म्हणजे संघाचा उद्देश ठरला गेला, आणि निरनिराळीं धर्ममतें हीं एकाच अमर धर्माची अंगोपांगें आहेत हें जाणून निरनिराळ्या धर्मांच्या अनुया-

यांमध्यें बंधुभाव उत्पन्न व्हावा यासाठीं श्रीरामकृष्णांनी ज्या तऱ्हेनें कार्य सुरू केलें तसें कार्य करणें हें या संघाचे कर्तव्य निश्चित करण्यांत आले. श्रीस्वामी विवेकानंद स्वतः या संघाचे अध्यक्ष झाले आणि मग मिशनचे काम जोरानें सुरू झाले, आज या रामकृष्ण मिशनच्या शाखा सर्व जगभर पसरलेल्या आहेत. त्याच्या या संघाने जनसेवेचें जें कार्य केलें तें परकी सरकारकडूनहि गौरवास पात्र ठरलें. इ. स. १८९९ सालीं कलकत्त्यास प्लेगने हाहाःकार उडविला होता. स्वामीजींच्या मार्गदर्शनाखालीं त्यावेळीं मिशननें जें कार्य केलें तें अपूर्व होतें. स्वामीजी स्वतः गल्लीच्या वस्तींत जाऊन राहिले व त्यानी मिशनच्या कार्यकर्त्यांना कार्यप्रवृत्त केलें, उत्तेजन दिलें. कलकत्त्याच्या चार जिल्ह्यातील दरिद्री वस्तींतून घाणीचें उच्चाटन करण्याची मोहीम मिशननें हातीं घेऊन गाड्या भरभरून घाण-कचरा काढण्याचें कार्य पार पाडलें, आणि तेथील घरन् घर जंतुरहित करण्याचा यत्न केला. या सर्व कामावर अर्थात् स्वामीजी स्वतः देखरेख करीत होते.

रामकृष्ण मिशनची स्थापना केल्यानंतर स्वामीजी ता. २० जून १८९९ रोजीं पुन्हा अमेरिकेस गेले त्यावेळीं त्यानी एस्. एस्. गोवळकोंडा या बोटीने प्रवास केला. १९०० च्या जुलैत ते फ्रान्सला गेले. तिथें त्यानी काहीं दिवस मुक्काम केला.

# संतकवि श्री· दासगणू महाराज

लेखक :–भगवान रामचंद्र कवटिकवार

**ह. भ. प. श्री. दासगणू महाराज यांचे नांदेड भागांतील एक भक्त श्री· भ. रा· कवटिकवार यानी त्यांच्यासंबंधी भक्तिभावानें लिहिलेला लेख महाराजांच्या पुण्यस्मरणार्थ प्रसिद्ध करण्यांत येत आहे. कै. संतकवि दासगणू महाराज हे श्रीसाईबाबांचे एक परम भक्त होते.**

ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथी आळंदी येथें भक्तांची अलोट गर्दी झाली होती. सर्व भक्त व संत ज्ञानेश्वर महाराजाचे, चरणी लीन झाले होते. जिकडे पहावे तिकडे गर्दीच गर्दी दिसत होती. सगळीकडे नामाचा गजर चालू होता.

" ज्ञानेश्वर माऊली ज्ञानदेव तुकाराम " सर्व वारकरी विठ्ठलाचे भक्त आळंदीला आले होते, पण विठोबा प्रतिवर्षांप्रमाणे या वर्षी ज्ञानेश्वराना भेटावयास आला नाहीं !

त्याला येवढे कशाचें काम होते.

विठोबा आज पंढरपूरात होते.आज त्यांच्या भेटीला ज्ञानेश्वराच्या तोडीचा एक भक्त येणार होता. त्याच्या स्वागतासाठी विठोबा पंढरपुरांतच होते.

आज कार्तिक वद्य १३ शके १८८४ ज्ञानेश्वराची पुण्य तिथी त्या निमित्ताने पंढरपूरात सुद्धा भजन व कीर्तन चालू होते परंतु दासगणू महाराज त्या दिवशी अस्वस्थ होते विष्णुसहस्रनामाचा पाठ तोंडाने चालू होता. विठोबाशी तन्मय झाले होते. कोणाशीही ते बोलत नव्हते. वरचेवर आवाज क्षीण होत होता. सर्वांचे चेहरे म्लान दिसत होते सर्वांच्या पोटात कालवाकालव होत होती.

## गायन—

श्री. गणपत धोंडिबा वाडेकर बेळगाव. श्री. श्रीरंग रामचंद्र नाईक, वडाळा.
श्री. पांडुरंग बाळाराम पाटील मुंबई. सौ. विजया बाळकृष्ण पतकी दादर मुंबई.
श्री. सी. रामचंद्र मुंबई.

गीतगोपाळ कार्यक्रम मातील कलाकार.

श्री. जयराम आचार्य. मुंबई. श्री. डी. एम्. टागूर मुंबई.
श्री. अण्णा जोशी. मुंबई. श्री. त्रिभुवन गोंदकर मुंबई.
श्री. चुनीलाल के. परदेशी मुंबई. श्री. सुधीर रानडे.
सौ. प्रमिलाबाइ दातार मुंबई. कु. तारका ठेंगडी. मुंबई.
कु. राणी वरमा मुंबई. कु. बकुळ पंडित पुणें.
श्री. नीलकंठ अभ्यंकर मुंबई. श्री. कल्याण चौधरी कलकत्ता.
श्री. रघुनाथ सांडभोर पुणें. सौ. नीला प्रभू. मुंबई.
श्री. श्रीराम विष्णू सावर्डेकर मुंबई. श्री. तुळशीरामबुवा दीक्षित मुंबई.
श्री. मारुतीबुवा बागडे मुंबई. सौ. मालतीबाई साळवी मुंबई.
श्री. लक्ष्मण गणपतराव देवासकर मुंबई.

## भजनी पार्टी

श्री. दि. स. कसरेकर ( भक्तराज ) इंदौर.

## नवल विशेष

कोजागिरी पौर्णिमे निमित्त रात्रौ श्रींचे समाधीवर तुळशीअर्चन चंद्रपूजा, श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर आणि मंडळी यांचे प्रवचन व रात्रभर संगीत, गायन भजन ( जागर ).

## हवापाणी

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | **श्रीसाईसच्चरित्र** | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ५–५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ५–२५ |
| ( ५ ) | ,, | ( Kannad ) | N. S. Anantha Raum | ६–०० |
| ( ६ ) | **A Glimpse of Indian Spirituality**–by Pradhan | | | १–५० |
| ( ७ ) | **A Glimpse of Indian Spirituality** ( Telugu ) | | | १–०० |
| ( ८ ) | **श्री साईलीलामृत** | ( मराठी ) | श्री. आगास्करकृत | २–७५ |
| ( ९ ) | **साईबाबा–अवतार व कार्य** | ( मराठी ) | श्री. धोंड | २–०० |
| ( १० ) | **साईबाबांचे ४ अध्याय** | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–५० |
| ( ११ ) | **सगुणोपासना** | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| ( १२ ) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| ( १३ ) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| ( १४ ) | **कीर्तन पंचक** | ( मराठी ) | श्री. देव | १–५० |
| ( १५ ) | **शीलधी** | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| ( १६ ) | **श्री साईगीतांजलि** | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| ( १७ ) | **Guide to Shirdi** ( English ) | | | ००–१२ |
| ( १८ ) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | ( मराठी ) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1. Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.

2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.